# प्रकरण तिसरे

## सामाजिक व धार्मिक कार्य

## प्रकरण तिसरे

## सामाजिक व धार्मिक कार्य

हिंदू धर्मात व समाजजीवनात कित्येक शतके चालत आलेले दोष नाहीसे करून नवहिंदू समाज निर्मिती करण्यासाठी एकोणीसाव्या शतकात देशाच्या विविध भागात स्थापन झालेल्या धार्मिक संप्रदायांपैकी आर्य समाज प्रमुख होता. स्वामी दयानंद सरस्वतींनी स्थापन केलेल्या या सुधारणा संप्रदायाने पंजाबमध्ये धार्मिक व सामाजिक सुधारणेला चालना दिली. ` वेदाकडे चला ` हे आर्य समाजाचे मुख्य ध्येय होते. सामाजिक सुधारणेच्या कार्यक्रमामुळे आर्य समाजाची लोकप्रियता वाढली. हैद्राबाद संस्थानातील धार्मिक व सामाजिक परिस्थिती अत्यंत प्रतिकूल असतानासुध्दा आर्य समाजाने तेथे उल्लेखनीय सामाजिक व धार्मिक कार्य केले. त्या कार्याची प्रस्तुत प्रकरणात विस्तृत चर्चा करावयाची आहे. मात्र त्या चर्चेपूर्वी हैद्राबाद राज्यातील तत्कालीन धार्मिक व सामाजिक परिस्थितीचा आढावा घेणे आवश्यक आहे.

हैद्राबाद राज्यात व पर्यायाने मराठवाड्यात आर्य समाजाचा उदय व प्रसार विसाव्या शतकाच्या सुरवातीस मोठया प्रमाणात झाला. इ.स. १८९१ ते १९३० पर्यन्तच्या कालखंडा त हैद्राबाद राज्यात अनेक ठिकाणी आर्य समाजाच्या शाखा स्थापन झाल्या. हा महर्षि दयानंद सरस्वती यांच्या आचार, विचारांचा प्रभाव होता असे म्हणावे लागेल. सुरवातीच्या काळात प्रत्येक शाखा स्वतंत्रपणेच कार्य करीत होती. त्या आपआपल्या परीने सामाजिक व धार्मिक सुधारणा घडवून आणण्याच्या कार्यात गुंतलेल्या होत्या. आर्य समाजाच्या अशा विविध ठिकाणी स्थापन झालेल्या शाखांवर व त्यांच्या कामावर निजाम सरकारचे लक्ष होते. पण हा काळ निजामाला तसेच आर्य समाजीयांना एकमेकांविषयी संशय वाटावा असा नव्हता. परंतु आर्य समाजाची स्थापना व समाजाचे सुधारणावादी

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

विचार तत्कालीन हिंदू सनातनवाद्यांना आव्हान वाटू लागले. तेव्हा त्यांनी त्या विरुद्ध काहूर माजवण्यास प्रारंभ केला. त्यांनी आर्य समाजाच्या धार्मिक कार्याला विरोध करण्यासाठी ` सनातन धर्म महामंडळ ` ही प्रतिसंस्था उभा केली. परिणामत: आर्य समाजास पहिल्यांदा हिंदू धर्मातील सनातनवाद्यांना तोंड द्यावे लागले. श्री. गोकुळप्रसाद व पं. दीन दयाळ शर्मा हे आर्य समाजाचे दोन प्रचारक व सनातनवादी यांच्यामध्ये धार्मिक प्रश्नावर बरेच वाद झाले. त्यामध्ये सनातन-वादी पूर्णपणे हरले. परिणामत: हैद्राबादमध्ये काही काळ वातावरण तंग झाले. तेव्हा इ.स. १८९४ मध्ये निजाम सरकारने आर्य समाजाचे संस्थानाबाहेरील दोन प्रचारक पं. बाळकृष्ण शर्मा व नित्यानंद ब्रह्मचारी यांना संस्थानात येण्यास बंदी घातली. काही सनातनवाद्यांनी निजाम सरकारशी संधान बांधून आर्य समाजाच्या कार्यावर प्रतिबंध घालण्याचे प्रयत्न सुरू केले. त्यांनी आर्य समाज हा इस्लाम विरोधी आहे असे सांगण्यास प्रारंभ केला. त्यासाठी आर्य समाजाची गीता ` सत्यार्थ प्रकाश ` या ग्रंथाच्या चौदाव्या भागात महर्षि दयानंदांनी महंमद पैगंबर व इस्लाम विरोधी लिखाण केले आहे असा दाखलाही त्यांनी दिला. तेव्हा मात्र अक्बर बहादूर जंग यांचा आणि संस्थानातील मुल्ला व मौलवी यांचा आर्य समाजविषयक दृष्टिकोन पूर्णपणे बिघडला. म्हणून आर्य समाजास या पुढील काळात आपले कार्य करीत असताना सनातनवाद्यांप्रमाणेच निजामी राज्यकर्त्यांशीही संघर्ष करावा लागला.

इ.स. १९३१ ते १९४० हा काळ तर आर्य समाजाच्या दृष्टीने तीव्र संघर्षाचा काळ होता. इ.स. १९३१ मध्ये आर्य समाजाच्या विविध शाखांचे एकत्रिकरण करून एक मध्यवर्ती संघटना स्थापन झाली होती. हैद्राबाद येथील ` आर्य प्रतिनिधी सभे ` च्या स्थापनेमुळे आर्य समाजामध्ये पुन्हा नवीन जोम निर्माण झाला होता. निजाम सरकारला व सनातनवाद्यांना समाजाची धास्ती वाटू लागली. आर्य समाजास आपले धार्मिक कार्य करीत असताना अनेक बंधने, अन्याय व जुलूम इ. ना तोंड द्यावे लागले. परिणामत: आर्य समाजास संघटित

स्वरूप प्राप्त झाले. तेंव्हा मात्र समाजाने आपल्यावरील अन्याया विरूध्द एक संघ लढा उभा केला. इ.स. १९४० ते १९४८ या काळात आर्य समाजाने आपला पवित्रा बदलून राजकीय रंगच परिधान केला. त्या काळात आर्य समाजाचे धार्मिक व सामाजिक क्षेत्रातील कार्य काहीसे मंदावल्याचे जाणवते.

अशा परिस्थितीत आर्य समाजाने धार्मिक व सामाजिक क्षेत्रात महत्वपूर्ण कामगिरी बजावली. आर्य समाजाने सामाजिक व धार्मिक क्षेत्रात केलेल्या कार्यामुळे निजामी राजवटीतील आर्य समाज हिंदू धर्माचा रक्षण कर्ता व सामाजिक समानतेची शिकवण देणारा संप्रदाय आहे, असे वाटू लागले. संस्थानी जनतेत धार्मिक जागृती आणि प्रतिकारक भावना यांची जोपासना करण्याचे फार मोठे श्रेय आर्य समाजाचे, आपली धार्मिक कर्तव्ये पार पाडण्यात सरकारी यंत्रणा वा प्रचलित कायदे आड येत असतील तर अशा यंत्रणेस विरोध करण्यास आवश्यक असलेला कणखरपणा आर्य समाजाच्या योगाने लोकात निर्माण झाला.[१] आर्य समाजाने आपले कार्य शहरापुरते मर्यादित न ठेवता ग्रामीण भागात ही त्याचा प्रसार केला. आर्यसमाजाने जाती व भाषा यांच्या भेद नितीवर मात करून लोकांशी जिव्हाळ्याचे सामाजिक संबंध प्रस्थापित केले. आर्य समाजाचे तत्वज्ञान हे सामाजिक समतेच्या पायावर उभारले असल्यामुळे हैद्राबाद संस्थानात हिंदू धर्माचे रक्षण करण्यात आर्य समाजास फार मोठे यश प्राप्त झाले.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात मुंबई प्रांतात मोठया प्रमाणात सामाजिक, धार्मिक व राजकीय जागृतीस प्रारंभ झाला होता. मराठवाडयातील बरेच विद्यार्थी मुंबई, पुणे, सोलापूर येथे शिक्षणासाठी जात असत. त्यामुळे मुंबई प्रांतातील जागृतीचे काही पडसाद मराठवाडयात उमटले. मराठवाडयात औरंगाबाद येथील इ.स. १९१८ ची शैक्षणिक परिषद, कवना (नांदेड) येथील इ.स.१९१८ मधील सामाजिक परिषद व समाज सुधारणा मंडळ (समाज सुधार संघटना) इ.

अनेक संघटनांनी सामाजिक जागृतीचे व सामाजिक सुधारणेचे कार्य हाती घेतले. श्री. वामनराव नाईक, केशवराव कोरटकर, गोविंदराव नानल, दिगंबरराव बिंदू इ. चा सुधारणा चळवळीतील कार्यकर्त्यांत समावेश होता. याच काळात आर्य समाजाने सामाजिक व धार्मिक सुधारणासाठी चळवळ संघटित करण्यास प्रारंभ केला. आर्य समाजाची शुध्दिकरण चळवळ, व्यायामशाळा, होम हवन, आंतर-जातीय विवाह इ. अनेक कार्ये ही वैदिक पध्दतीवर आधारित होती. धार्मिक व सामाजिक स्वातंत्र्यासाठी लढा उभा करण्याची ताकद आर्य समाजाने हिंदूंच्यात निर्माण केली. तेंव्हा मात्र निजाम शासन आर्य समाजाच्या प्रत्येक कार्यक्रमाकडे शंकेने पाहू लागले. आर्य समाजावर अनेक बंधने लादण्यात आली. निजामी शासकांनी लादलेल्या बंधनातूनही आर्य समाजाने धार्मिक स्वातंत्र्याचा लढा चालूच ठेवला. हैद्राबाद संस्थानातील व पर्यायाने मराठवाड्यातील आर्य जनांना सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभेनेही पाठिंबा दिला व आपले उपदेशक आर्य समाजी पाठवून लोकांच्या मनात धैर्य निर्माण केले.

तत्कालीन सामाजिक व धार्मिक परिस्थिती :

हैद्राबाद राज्यात आर्य समाज हिंदूंना सहानुभूतीने वागवत असे आणि त्यांच्या धार्मिक हक्कासाठी जागरूक होता. ही गोष्ट मुसलमानांना सातत्याने खटकत होती. कारण ते भोळ्या अस्पृश्यांना तसेच गरीब हिंदूंना सक्तीने मुसलमान करीत होते. सक्तीच्या धर्मांतराला शह देण्यासाठी आर्य समाजाने धर्मांतर केलेल्या पूर्वाश्रमीच्या हिंदूंना वैदिक पध्दतीने हिंदू धर्मात घेण्याची शुध्दी चळवळ सुरू केली. इस्लामी करणाचे आपले स्वप्न आता धुळीस मिळाले असे निजाम शासकांना वाटू लागले. तेव्हा मुस्लीम संघटनांबरोबरच सरकारी अधिकारी, पोलिस या सर्वांची समाजाकडे वक्रदृष्टी वळली. हिंदूंच्या देवदेवता बाबत घृणा निर्माण करण्यात आली. शिवाय धार्मिक विभागाकडून (महकमा अमूरे मजहबी) पूर्व परवानगी घेतल्याविना पूजापाठ करण्यावर बंदी घालण्यात आली. ज्या विभागात मुस्लीम लोकसंख्या अधिक होती, त्या भागातील हिंदूंच्या मंदिराची अवस्था दयनीय झाली

होती. शिवाय हिंदूंना आपल्या घरात देवदेवतांची चित्रे लावण्यासही मनाई केली जात असे. मुस्लीमांना आपले उत्सव साजरे करण्यास हरकत नव्हती, परंतु हिंदूच्या उत्सावर मात्र बंदी असे(

निजामाने स्थापन केलेल्या स्वतंत्र धार्मिक विभागामध्ये मुस्लीमांचाच भरणा होता. त्या अंतर्गत हिंदूच्या धार्मिक विभागाचा समावेश करून उत्सवासाठी परवानगी देण्याबाबत तरतूद करण्यात आली होती. पण हिंदूच्या धार्मिक कार्याला परवानगी देणे अथवा न देणे हा त्यांच्या मर्जीतील प्रश्न होता. त्यांच्या पक्षपाती धोरणामुळे हिंदूच्या मनात असंतोष निर्माण झाला. निजामी राज्यात सर्वस्वी मुसलमानांचे वर्चस्व होते. निजामाचे राज्य म्हणजे इस्लामी राज्य, अशी त्या काळातील मुसलमानांची धारणा होती. निजाम राज्यात ८० टक्के प्रजा हिंदू होती आणि फक्त १० टक्के मुसलमानांचे सर्वत्र वर्चस्व होते. हिंदूच्यावर कायद्याची बंधने लादून निजामी राज्यात इस्लामीकरणाची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. त्याला आर्य समाजाने पायबंद घालण्यास प्रारंभ केला. हे निजामी शासकांना रुचणारे नव्हते. हैद्राबाद संस्थानातील तत्कालीन सामाजिक स्थितीचे विश्लेषण करताना स्वामी रामानंद तीर्थ म्हणतात, " निजाम या व्यक्तीभोवती मुस्लीम जातीय धर्माधिकाराचे जाळे गुंफले जात होते. मुसलमान असणे हेच विशेषाधिकाराचे द्योतक होते. मुस्लीमेतर म्हणजे कुणीतरी पददलित मुसलमान हा धनी तर हिंदू हा गुलाम. सामाजिक जीवनावर ही याच भावनेची छाया पसरलेली होती. हिंदूची सर्व बाजूनी चाललेली कुचंबणा अगदी स्पष्ट दिसत होती. अशा परिस्थितीत जनतेचे मनोधैर्य अगदी खचले होते पण ही कुचंबणा किती दिवस चालणार ? लोकांचा स्वाभिमान हळूहळू जागृत होत होता....प्रथम सरकारी जुलमाच्या प्रतिकाराला धार्मिक स्वरूप प्राप्त झाले. त्यातूनच जनतेचा पक्ष घेऊन लढणा-यात आर्य समाज आघाडीवर होता. प्रत्यक्षात सरकारने चोहोबाजूंनी चालवलेल्या जुलमाची ती प्रतिक्रिया होती. तरी ती सर्व धार्मिक जागृतीच होती."[२]

इ.स. १९३१ मध्ये हैद्राबाद आर्य प्रतिनिधी सभेची स्थापना होऊन समाजाचे कार्य संघटितपणे चालू झाले. इ.स. १९११ मध्ये हैद्राबाद राज्यात सत्तेवर आलेल्या मीर उस्मान अली खाँ याच्या कारकिर्दितच आर्य समाजाच्या चळवळीने खरा जोर धरला होता. हा सातवा निजाम धर्मवेडा होता. त्याचे वडील मेहबूब अली खान यांच्या कारकिर्दित हैद्राबाद राज्यात आर्य समाजाची स्थापना झाली होती. मेहबूब अली खान हे मात्र उदार विचारसरणीचे होते. जेंव्हा मुसा नदीस पूर आला तेव्हा समाजाने पूरग्रस्तांना दिलेले सहाय्य पाहून ते प्रसन्न झाले. शिवाय त्यांनी आर्य समाजाचे प्रधान गयाप्रसाद याना प्रशस्तीपत्र व सोन्याचे घडयाळ भेट दिले. इतकेच नव्हे तर बरेच प्रतिष्ठित मुस्लीम नबाब आर्य समाजाच्या वार्षिक उत्सवामध्ये सहभागी होत होते. यावरून रियासतीत हिंदू-मुस्लीम गुण्यागोविंदाने राहत होते हे स्पष्ट होते. परंतु निजाम जेव्हा हुकुमशहा बनून खलिफा पदाची स्वप्ने पाहू लागला, तेव्हा मात्र आर्य समाज त्याच्या डोळयात सलू लागला.

<u>मुस्लीम जातीयवादी संघटना</u> :

मीर उस्मान अली खान बहादूर (इ.स. १९११ ते १९४८) याच्या कारकिर्दितच हैद्राबाद राज्यात मुस्लीम जातीयवादी संघटनाच्या प्रचाराला गती मिळाली. आर्य समाजासारख्या लोकप्रिय संघटनेला शह देण्यासाठी ` सिद्दिक दिनदार,`` इत्तेहादूल मुसलमीन ` इ. संघटना कार्य करू लागल्या. दि. २-९-१९२९ रोजी इस्लाम धर्माच्या प्रसारासाठी ` सिद्दिक दिनदार ` ही संघटना स्थापन झाली. या संघटनेचा नेता ` सिद्दिक दिनदार ` हा आपण स्वत: चन्नबसवेश्वराचा अवतार आहोत आणि बसवेश्वराच्या तत्वज्ञानाचा प्रसार करण्यासाठी मुस्लीम धर्म आहे असे सांगू लागला. त्याने व त्याच्या अनुयायानी हिंदूना मुसलमान धर्माची दिक्षा देण्याचे कार्य सुरु केले.[3] तेव्हा सिद्दिक दिनदारच्या खोटया प्रचारास आर्य समाजाने शह दिला. केवळ आर्य समाजामुळेच मराठवाडयात सिद्दिक दिनदार

संघटनेचे प्रयत्न सफल होऊ शकले नाहीत. आर्य समाजाचे उपदेशक पं.मंगलदेवजी शास्त्री व पं.रामचंद्रजी देहलवी यानी सिद्दिक दिनदारच्या कारवाया हाणून पाडल्या. पं. मंगलदेव शास्त्री यानी औरंगाबाद, नांदेड, हिंगोली, परभणी, जालना, कळंब इ. ठिकाणी वैदिक धर्माचा प्रचार केला.

पं. रामचंद्रजी देहलवी इ.स. १९२९ मध्ये सर्व प्रथम हैद्राबाद राज्यात आले. तेंव्हा हिंदू धर्मावर चोहोबाजूंनी इस्लामी संघटनांचे पाश आवळले जात होते. त्यांनी जेंव्हा कुराणावर भाष्य करण्यास प्रारंभ केला, तेंव्हा अनेक मौलवींनी तोंडात बोट घातले. परंतु निजामाच्या धार्मिक विभागाकडून (अमूरे मझबी) विषारी जातीयवादी प्रचारास खत पाणी घातले जात होते. १२ आबान १३२४ फसली (१९१५) चे सरकारी पत्रक क्रमांक ७ सं. ६६५४ नुसार धार्मिक विभागाचे अध्यक्ष मुहमंद अकबरमुल्ला खाँ यानी खालील प्रमाणे आदेश जारी केला होता. त्यामध्ये ते म्हणतात " आर्य समाजी हिंदुस्थान की तमाम कौमों को मिलाकर और कुराण को जलाकर अपना मतलब निकालना चाहते है । .... ऐ मुसलमानो । जिस तरह रोजा, नमाज, हज और जकात तुम्हारा फर्ज है, वैसे ही जिहाद भी तुम्हारा फर्ज है ।"[४] अशारितीने मुसलीमांना चिथावणी देण्याचे उद्योग खुद्द निजामाचे अधिकारी करत होते. पं. रामचंद्रजी देहलवी यांची वेदावरील व्याख्याने, त्यांचा अभ्यास व प्रचार याने चकित होऊन आणि सडतोडपणाने विरोधकांना नामोहरण करण्याची त्यांची शास्त्रार्थाची पध्दती पाहून शासकाची त्यांच्यावर वक्रदृष्टी झाली. अखेर १९३३ साली बिदर जिल्हातील हळीखेड येथे त्यानी दिलेल्या भाषणाच्या आधारे त्यांच्यावर खटला दाखल करण्यात आला. सर्व देशभर संतापाची लाट उसळली. हैद्राबाद आर्य प्रतिनिधी सभेने निजाम राज्यामध्ये आर्य समाजी कार्यकर्त्यांवर होत असलेल्या अन्यायाबाबत सार्वदेशिक सभेस कळवले. तेंव्हा सार्वदेशिक सभेने निजामाला तार करून पं. रामचंद्रजी देहलवी यांच्यावरील खटला काढून घेण्यास सांगितले.

नंतर जून १९३४ मध्ये सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभेचे मंत्री प्रो.श्री. सुधाकरजी ही परिस्थिती पाहण्यासाठी हैद्राबादला आले. तेथील पोलिस आर्य समाजावर प्रतिबंध लादून आपली धर्मांधता दाखवत आहेत असा त्यांनी आरोप केला. दिनांक २८ व २९ जून १९३४ रोजी त्यानी पोलिटिकल मिनिस्टर व पोलिस यांच्याकडे न्यायाची मागणी केली. तेंव्हा त्यांना न्यायाचे आश्वासन मिळाले. परंतु जरिए फरमान-ए-मुबारक ता. ६ रब्बिउस्सानी सन १३५३ हिजरी तदनुसार १८ जुलाई १९३४ के द्वारा पं. रामचंद्रजी को स्टेट से निर्वासीत करने की आज्ञा दी और पुन: प्रवेश पर प्रतिबंध लगा दिया। "[५] ही सूचना १० जुलै १९३४ च्या पत्राने सार्वदेशिक सभेस खालील प्रमाणे कळविण्यात आली होती. तार के सिल सिले में मै आपको सूचित करना चाहता हूँ कि पंडित रामचंद्रजी को हैद्राबाद से निर्वासित करने की आज्ञा हो चुकी है। और पुलीस द्वारा चलाया गया अभियोग उन परसे उठा लिया गया है।[६] सार्वदेशिक सभेने वरील पत्रास खालील प्रमाणे उत्तर दिले.

" आपके पत्र के उत्तर में यह निवेदन करना चाहता हूँ कि पं.रामचंद्रजी पर लगाई गई पाबंदी एक सनसनी फैलादी है। जिस प्रकार उनपर से अभियोग उठा लिया गया है। उसी प्रकार उन पर लगाई गई पाबंदी थी शीघ्र उठा लेकर अशांत आर्यों को शांत करें।"[७]

निजामाच्या वाढत्या कारवायामुळे आर्य समाजी लोक असंतुष्ट झाले. सर्वजण आंदोलनाच्या पावित्र्यात उभा राहिले. दि. २ सप्टेंबर १९३४ रोजी 'हैद्राबाद दिवस' साजरा करण्याची समाजाने सर्वांना आज्ञा दिली व होणाऱ्या अन्यायाबाबत सार्वदेशिक सभेला पत्रे पाठविण्यात आली. त्यानुसार सार्वदेशिक सभेने हैद्राबाद शासकाना स्मरणपत्र पाठवले त्यामध्ये सात मागण्यांचा प्रस्ताव दाखल करण्यात आला. दि. १३ सप्टेंबर १९३४ रोजी निजामाकडून त्याचे स्पष्टीकरण देण्यात आले ते पुढील प्रमाणे :

" निजाम की सरकार अपनी प्रजा के प्रती व्यवहार में निपदा है। और सदैव रही है। चाहे वह प्रजा किसी भी धर्म या संप्रदाय से संबंध रखती हो। आर्य समाजियोंको किन्ही विशेष पाबंदीयों के आधीन रखने का सरकार का कभी विचार नहीं रहा है।"[८]

वरील धोरणाबाबतची वस्तुस्थिती काय आहे हे पाहण्यासाठी श्री. महात्मा नारायण स्वामी, प्रधान, सार्वदेशिक सभा, श्री. आचार्य रामदेवजी प्रधान, पंजाब प्रतिनिधी सभा, श्री. स्वामी स्वतंत्रानंदजी महाराज याना सार्वदेशिक सभेने हैद्राबादला पाठवले. त्यानी सर्व राज्यात फिरून प्रचार व भाषणे केली. त्याला पोलिसांनी कसलाही अडथळा केला नाही. परंतु जेंव्हा ते निघून गेले तेंव्हा मात्र पुन्हा बंधने लादण्यात आली.[९] हैद्राबाद संस्थानामध्ये जनतेला किती त्रास सहन करावा लागत आहे याची दखल संस्थांना बाहेरील अनेक वृत्तपत्रांनी घेतली. इ.स. १९२६ ते १९२८ या काळात संपूर्ण हिंदुस्थानातील वृत्तपत्रांनी याची दखल घेतली. निजामाने इ.स. १९२१ च्या राजकीय संघटनावर बंदी घालणाऱ्या कायदाबरोबर सर्वच सभांना बंदी घालणारा आणि लोकजागृतीस अडसर निर्माण करणारा एक कायदा इ.स. १९२९ मध्ये मंजूर केला, तोच ' गश्ती निशाण ५३ ' या नावाने ओळखला जातो. त्यानुसार सार्वजनिक सभा, समारंभ व उत्सव यावर बंदी घालण्यात आली. हा काळा कायदाच होता. आर्य समाजी कार्यकर्त्यांसाठी ' मन्नानूर ' (तेलंगण) हे काळ्या पाण्याचे ठिकाण होते. त्यांना शिक्षा म्हणून तेथे पाठवण्यात येत असे.

बहादूर यार जंग यांच्या नेतृत्वाखाली ' इत्तेहादुल मुसलमीन ' या संघटनेने तर हैद्राबाद संस्थान हे इस्लामी राज्य आहे असा उघड प्रचार सुरू केला. मुसलमान समाज हा राज्यकर्ता वर्ग असून निजाम हा मुसलमानांच्या अधिसत्तेचे प्रतिक आहे, असा प्रचार ही संघटना करीत होती. इ.स. १९२७ ते १९४४ पर्यन्त बहादूर जंग हे या संघटनेचे प्रमुख होते. त्यांच्यानंतर कासिम रझवी हा या संघटनेचा प्रमुख

झाला. निजाम स्वत: सुध्दा या संघटनेला अनुकूल होता. कासिम रझावीने पुढे रझाकारांची सशस्त्र संघटना स्थापन करून जातियतेचे विष संस्थानामध्ये पसरवण्यास आरंभ केला. कासिम रझावीच्या संघटनेने अनेक आर्य समाजी कार्यकर्त्यांना दमबाजी केलीच तर अनेकांना कंठस्नान घातले. अशा पीडित आर्य समाजी कार्यकर्त्यांतील बहुसंख्य मराठवाड्यातील होते. निजामाचे मुस्लीम जातीयवादी संघटना धार्जिणे धोरण हे हिंदूंना अत्यंत घातक होते. धार्मिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी रक्तपात झाला पाहिजे या निजामी शासनाच्या धोरणावरून ते शासन किती धर्मांध झाले होते हे स्पष्ट होते. त्यामुळेच संस्थानी प्रजेत निजामी शासनाबद्दल अप्रिती निर्माण झाली होती.

<u>धार्मिक संस्थांना मदत</u> :

खालील तक्त्यावरून निजामी शासकांनी राज्यातील विविध धर्मियांना केलेल्या आर्थिक मदतीचे तुलनात्मक चित्र नजरेसमोर उभा राहते.

| धर्म | वार्षिक धार्मिक मदत | खास धार्मिक वार्षिक मदत | वार्षिक जनकल्याण मदत | एकूण |
|---|---|---|---|---|
| मुसलमान | १८९७४२ | २००६४२ | ५९७० | ३९६३५४ |
| हिंदू | १८०० | १३४४ | - | ३१४४ |
| ईसाई | १४२८० | २४६० | - | १६७४० |
| पारशी | - | ६०० | - | ६०० |

१a

वरील तक्त्यावरून निजामाने मुस्लीम संस्थांना जास्तीतजास्त अर्थसहाय्य केल्याचे स्पष्ट होते. परिणामत: अन्य धर्मियांच्या विशेषत: हिंदूंच्या मनात असंतोषाची भावना निर्माण झाली.

UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

शेवटच्या निजामाने इतर निजामापेक्षा अधिक धर्मांधता दाखवली आणि लोकांवर अत्याचार केले. हिंदूंच्या सक्तीच्या धर्मांतरास म्हणजे हिंदूंचे मुस्लीम म्हणून धर्मांतर करण्यास त्याचे सक्रिय प्रोत्साहन होते. मुस्लीम जातीयवादास खतपाणी घातले जाऊ लागले. इ.स. १९३४ मध्ये काढण्यात आलेल्या निजामी परिपत्रकांनी तर आर्य समाजाच्या हवन विधीवर आणि सार्वजनिक सभांवर प्रतिबंध घातले, परंतु अशाही स्थितीत आर्य समाजाने धार्मिक व सामाजिक स्वातंत्र्यासाठी खंबीर भूमिका स्विकारली.

आर्य समाजाच्या १४ मागण्या :

आर्य समाजास विविध फर्माने व बंधनामुळे सामाजिक व धार्मिक सुधारणेच्या कार्यात अडथळे निर्माण होत होते. तेंव्हा हे अडथळे दूर करून सामाजिक व धार्मिक क्षेत्रात भरीव कामगिरी करता यावी म्हणून आर्य समाजाने इ.स. १९३८ मध्ये आपल्या काही मागण्या निजाम सरकारपुढे मांडल्या. त्या पुढील प्रमाणे होत्या :

१) गश्ती निशाण ५३ (सर्क्युलर नं.५३) इ.स. १९२९. जनसभेवर प्रतिबंध घालणारे हे परिपत्रक रद्द करण्यात यावे.

२) धार्मिक उत्सवावर घालण्यात आलेली बंदी उठवण्यात यावी.

३) आखाडा (व्यायामशाळा) स्थापन करण्याबाबत जे जाचक नियम करण्यात आले आहेत ते संपुष्टात आणावेत.

४) खाजगी पाठशाळांच्या संदर्भात लावण्यात आलेल्या आदेशाची समाप्ती करावी.

५) जातीय दंगलीशी संबंधित खटले एका नि:पक्षपाती न्यायालयाकडे सोपवावेत.

६) बाहेरून येणाऱ्या उपदेशकांवर बंदी घालू नये. जर एखादा कार्यकर्ता राज्याने केलेल्या कायदा विरूध्द वर्तन करत असेल तर त्याच्यावर खटला भरण्यात यावा. धार्मिक कार्यकर्त्यांवर घातलेली बंदी उठवावी.

७) पुस्तके विना चौकशी जप्त करण्यात येऊ नयेत.

८) आर्य समाजी वृत्तपत्रांना परवानगी द्यावी.

९) सर्व हिंदू अथवा आर्य यांचे धार्मिक उत्सव जर मुसलमानाच्या धार्मिक उत्सवाप्रसंगी येत असतील तर त्यांना आपले उत्सव साजरे करण्यास पूर्ण स्वातंत्र्य मिळावे.

१०) आर्य समाज अथवा हवनकुंड स्थापन करण्यासाठी परवानगीची गरज नसावी.

११) कैदेत असणाऱ्या हिंदूंना मुसलमान करू नये आणि त्या कैद्यांना धार्मिक शिक्षण देण्यासाठी परवानगी मिळावी.

१२) सरकारी नोकरीमध्ये जे आर्य आहेत त्यांना त्रास देण्यात येऊ नये अथवा त्यांच्यावर सक्ती करू नये.

१३) आर्य लोकांच्या घरावर व समाज मंदिरावर झेंडा लावण्याचे स्वातंत्र्य देण्यात यावे.

१४) ज्या व्यक्तींच्यावर ज्या ठिकाणी खटले चालू असतील ते नि:पक्षपाती ट्रिब्युनलकडे सोपवण्यात यावेत.[११]

धार्मिक व सामाजिक स्वातंत्र्यासाठी आर्य समाजाने वरील सर्व मागण्या केल्या होत्या. निजाम शासनाने जर या मागण्याकडे दुर्लक्ष केले तर सर्व जनतेला बरोबर घेऊन वरील मागण्याबाबत आर्य समाजाला संघर्ष करावा लागणार होता. त्यानुसार २६ डिसेंबर १९३८ रोजी सोलापूर येथे झालेल्या आर्य महासंमेलनामध्ये वरील मागण्याबाबत विचार करण्यात आला. त्यातूनच आर्य समाजाने धार्मिक

स्वातंत्र्यासाठी सत्याग्रहाची सुरवात केली. तेव्हा मुस्लीम जातीयवाद्यांनी आर्य समाजावर विविध आरोप केले. `मजलिसे इत्तेहादुल मुसलमीन` संघटनेचे अध्यक्ष बहादूर यार जंग यानी असा आरोप केला की, ` यह जमात (आर्य समाज) जाहिरा तौर पर धार्मिक स्वतंत्रता की दुहाई देती है, पर उसका असली लक्ष्य किंग कोठी है। (निजाम का आवास)`[१२] अशा अफवा व प्रचार याने आर्य समाजाच्या चळवळीस बदनाम करण्याचे प्रयत्न चालू होते. निजामानी मुस्लीम जातीयवादी संघटनांचा आधार घेऊन आर्य समाजाचे हवनकुंड व मंदिरे उध्वस्त करण्याचा सपाटा लावला. मराठवाड्यात निलंगा, उदगीर इ. ठिकाणी तर समाजाच्या धार्मिक कार्यांवर नेहमी आपत्ती येत होती. तेव्हा आर्य समाज व हिंदू महासभा यानी सत्याग्रह सुरू केले. अखेर निजामास आर्य समाजाच्या धार्मिक मागण्या काही प्रमाणात मान्य कराव्या लागल्या म्हणून ८ ऑगस्ट १९३९ च्या निजामी फरमानानंतर सार्वदेशिक सभेने सत्याग्रह बंद करण्याची घोषणा केली.

एवढे होऊनही मुसलमान आर्य समाजी कार्यकर्त्यांवर अत्याचर करणे चालूच ठेवले. अनेक आर्य बांधवाना निर्वासीत व्हावे लागले. हैद्राबाद संस्थानात आर्य बांधवाना ज्या परिस्थितीला तोंड द्यावे लागत होते त्याबाबत सेतू माधवराव पगडी म्हणतात, ` हैद्राबाद राज्यात हिंदूंच्या धार्मिक उत्सवावर अवकाळा पसरलेली असे. परवानगीला कटकटी, मुसलमानांकडून परवानगीला हरकत येईल की काय याबद्दल धास्ती, असे एकंदरीत निरुत्साहाचे वातावरण असे. सरकारच्या धार्मिक खात्याचे हुकमही मुसलमानांचा पक्षपात करण्याचे असत. असे आचरट हुकूम किती सांगावेत.`[१३] अशा वातावरणामुळे अनेक जातीय संस्थांना आपोआपच संधी प्राप्त झाली. परिणामत: आर्य समाज चळवळीला संघटित व्हावे लागले. गेल्या काही वर्षांपासून त्यांच्यावर सरकारी दडपशाहीचा वरवंटा फिरवला जात होता. ओंमचे ध्वज जाळले जात होते. हवनकुंडाची विटंबना चाली होती. आर्य समाजाच्या मंदिरावर छापे घातले जात होते. त्यांच्या कार्यकर्त्यांना त्रास दिला जात असे....मुस्लीमांच्या उन्मतपणाला तोंड देण्यासाठी हैद्राबादेतील आर्य समाजी

लोकांनी एक मध्यवर्ती संस्था उभी केली होती. अखिल भारतीय आर्य समाज संस्थेचा त्यांना पाठिंबा होता.[१४]

एच.ई.एच. दि निजाम मीर उस्मान अली खाँ याला आर्य समाजाची चळवळ म्हणजे इस्लाम धर्मावर आलेले धार्मिक संकट वाटत होते. त्यामुळे ही चळवळ संपुष्टात आणण्याचे मार्ग अवलंबण्यात येत होते. पण लोकजागृती व आर्य कार्यकर्त्यांचा उत्साह यामुळे हैद्राबाद संस्थानात व पर्यायाने मराठवाडयात निजामाचे धार्मिक अधिसत्ता प्रस्थापनेचे डाव पूर्णपणे फसले.

आर्य समाजाला आपल्या सामाजिक व धार्मिक स्वार्त-यासाठी संघर्षाचे रणशिंग फुंकावे लागले आणि त्यामधूनच सुधारणांचे पाऊल उचलावे लागले. निजाम सरकारचे जातीयवादी धोरण उघड असतानासुध्दा आर्य समाजाने प्रतिकाराची भूमिका सोडली नाही. मराठवाडयातील आर्य समाजी कार्यकर्त्यांचा हा संघर्ष उस्मानाबाद व नांदेड या दोन जिल्हात प्रभावी होता. इ.स. १९३८ मध्ये आर्य समाजास अत्यंत वाईट दिवस आले होते. कोणतेही धार्मिक कार्य करणे अवघड झाले तेंव्हा मात्र कार्यकर्त्यांना लढावू भूमिका स्विकारावी लागली.

<u>निजाम सत्ताधीशांचे प्रतिबंधात्मक आदेश</u> :

आर्य समाजाच्या फैलावामुळे निजामी सत्ताधीश समाजाच्या प्रत्येक हालचालीकडे संशयाने पाहात होते. त्यांनी प्रचारक व धार्मिक कार्य याबाबत विविध फर्माने काढून समाजाबाबत दबाव तंत्राचा वापर केला. आर्य समाजाने मोठया प्रमाणात आपली शक्ती दाखवण्याचा प्रयत्न केला असला तरी धार्मिक विभागाच्या आदेशांनी त्याला पुन्हा जेरबंद करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. त्याची अनेक उदाहरणे सांगता येतील.

सब इन्सपेक्टर ऑफ पोलिस हावजापालीम जि. परभणी यांच्याकडून दि. १४ फरवरादी १३४२ फसली आलेल्या आदेशानुसार -

प्रति,

मोहमद खान नाकेदार नाकासोनी

“ आताच माझ्या आलेल्या सुचनेनुसार काही आर्य समाजिस्ट माळेगाव खेडयास भेट देण्यासाठी जाणार आहेत. त्याबाबतचा अहवाल मिळावा.”[15]

हवणकुंड व पूजा स्थानावर बंदी घालण्याबातचे पत्र.

२४ [illegible]स्फिनदर १३४७ फसली.

“ उस्मानाबाद जिल्हातील लातूर व तुळजापूर येथे विना आज्ञा हवणकुण्ड स्थापन होत असल्याची सूचना मिळाली आहे. त्यानुसार स्थानिक अधिका-यांच्याकडून माहिती मागवण्यात येत आहे की तेथील हवणकुण्डाच्या स्थापनेमुळे त्याजवळ असलेल्या इतर धर्माच्या पूजास्थानामुळे संघर्ष होण्याची भीती आहे का ?”[16]

पोलिस सबइन्सपेक्टर, औसा यांच्याकडून (दिनांक १३ अमरदाद १३४८ फसली) श्री. रघुनाथ प्रसाद व घनश्याम प्रसाद आर्य निवासी ` नागर सोगा ` यांना -

“ आपण आर्य समाजामध्ये स्थापन केलेले हवनकुण्ड हे बेकायदेशीर असून आपल्या विरूध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.”[17]

वरील उदाहरणावरून निजाम सरकारचा आर्य समाजाबाबतचा दृष्टिकोन स्पष्ट होतो. निजाम सरकारने आर्य समाजाची दिक्षा घेतलेल्या सरकारी नोकरांना कामावरून काढून टाकण्याचे फर्मान काढले. एवढेच नव्हे तर सरकारी नोकर आर्य समाजी व्यक्ती बरोबर बोलत असल्याचे दृष्टीस पडले तर त्याना ताबडतोब नोकरीतून काढून टाकावे अशा सर्व अधिका-यांना सूचना दिल्या गेल्या

होत्या. एकूण निजाम सरकारचे आर्य समाजी लोकांबद्दल अत्यंत कडक धोरण होते.[१८] तरीसुध्दा आर्य समाजिस्टांनी आपला पिंड बदलला नाही धार्मिक स्वार्त-यासाठी त्यानी आपला लढा चालूच ठेवला.

आर्य समाजाच्या सामाजिक व धार्मिक
सुधारणांची पार्श्वभूमी :

हैद्राबाद रियासतीमध्ये आर्य समाजाचा उगम सर्व प्रथम मराठवाडयामध्ये इ.स. १८९१ मध्ये झाला. तथापि आर्य समाजाच्या सामाजिक व धार्मिक सुधारणांची खरी सुरवात मात्र इ.स. १९३० पासून झाली. तत्पुर्वीच्या काळात ही आर्य समाजाच्या शाखांनी सामाजिक जागृतीच्या कार्यात उत्साहाने भाग घेतला.

१ जून १९४० रोजी सोलापूर येथे दयानंद कॉलेज या संस्थेची स्थापना झाली. त्यामुळे मराठवाडयातील सामाजिक प्रबोधनास फार मोठा हातभार लागला. सोलापूर शहर मराठवाडयाच्या लगतच असल्यामुळे तेथे होणा-या आर्य समाजी नेत्यांच्या व्याख्यानातून मराठवाडयातील विद्यार्थ्यांवर सदाचार व अस्पृश्यता निर्मूलन याबाबतचे संस्कार होण्यास फार मोठी मदत झाली. इ.स. १८९२ मध्ये आर्य समाजात फूट पडून दयानंद अँग्लो-वैदिक कॉलेज गट व गुरूकुल गट असे दोन विभाग तयार झाले. पहिल्या गटाचे नेतृत्व लाला हंसराज करीत होते तर दुस-या गटाचे नेते स्वामी श्रध्दानंद हे होते. महाराष्ट्रामध्ये डी.ए.व्ही. संस्थेची सोलापूर, मुंबई येथे महाविद्यालये आहेत. सोलापूर येथील दयानंद महाविद्यालय, हैद्राबाद मुक्ती संग्राम यशस्वी करण्याच्या दृष्टीने जसे उपयुक्त ठरले, त्याचप्रमाणे मराठवाडयातील सामाजिक व धार्मिक सुधारणेच्या दृष्टीने ही अधिकच उपयुक्त ठरले. मराठवाडयातील आर्य समाजाच्या चळवळीस पाठिंबा मिळावा, शिक्षण प्रसार व्हावा तसेच निजामी सत्ताधीशांना शह देण्यासाठी व आर्य समाजाचा प्रसार वाढविण्यासाठी उपयुक्त केंद्र उभारावे या उद्देशाने आर्य समाजाने आर्य समाजाने सोलापूर येथे आपले केंद्र स्थापन केले असावे असे वाटते.

मराठवाड्यातील आर्य समाजाने तसेच प्रमुख कार्यकर्त्यांनी विविध सामाजिक सुधारणा राबवून सामाजिक सुधारणांचे नवे पर्व निर्माण केले त्यामुळे आर्य समाज ही केवळ धार्मिक चळवळ नसून ती एक सामाजिक व धार्मिक सुधारणेची चळवळ आहे हे लोकांच्या ध्यानात आले. आर्य समाजाने पुढील प्रमाणे सामाजिक व धार्मिक सुधारणा केल्या. त्या सुधारणा तत्कालीन मराठवाड्यात कशा उपयुक्त ठरल्या याचा येथे विचार करावयाचा आहे.

सामाजिक कार्य :

आर्य समाजाने सामाजिक क्षेत्रात आंतरजातीय विवाह, हैद्राबाद निर्वासित कक्षाची निर्मिती, गोरगरीबांना सहाय्य, जातीयता निर्मूलन इ.सारखी कामे केली. हे कार्य करीत असतानाच समाजाला निजामाच्या जाचाला तोंड द्यावे लागले. त्यामुळे एका बाजूला बंदीची फर्माने तर दुसऱ्या बाजुला सामाजिक कार्याची निकड अशा कठीण परिस्थितीतून समाजाने केलेली वाटचाल निश्चितच कौतुकास्पद वाटते.

आर्य समाज जातीसंस्था मानीत नाही. आर्य समाजाने वैदिक वर्णाश्रम धर्माचा पुरस्कार केला पण वर्ण जन्मजात नसून कर्माप्रमाणे ठरतो असेरमानले. आर्य समाजी सर्व जातींना वेदाध्ययनाचा अधिकार आहे असे म्हणतात. या समाजाने मागासलेल्या जातीच्या उन्नतीसाठी फार कष्ट घेतले. जन्माऐवजी गुणाची कसोटी लावून समाजाने खऱ्या अर्थाने लोकशाहीस प्रारंभ केला, असे म्हणावे लागेल.

आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन :

आर्य समाजाने जातीपातीच्या बंधनाला मूठ माती दिली. आपण सगळे समान आणि एक आहोत ही भावना सर्वत्र रुजवली गेली. निजाम राज्यात दलित जातींची अत्यंत दयनीय अवस्था होती हे लक्षात घेऊन दलितांच्या उध्दारासाठी आर्य समाजाचे रचनात्मक कार्यास प्रारंभ केला आणि दलितांना समाजात

प्रतिष्ठा मिळवून दिली.[१९] त्यामुळे हजारो स्त्री-पुरुषांनी आर्य समाजाचे वैदिक आणि राष्ट्रीय विचार जनमानसात रुजविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा केली. आर्य समाजावर विविध मार्गांनी विनाकारण बंदीचे आदेश निघू लागले परंतु तत्वनिष्ठ आर्य समाजी आपल्या विचारांपासून तसूभर ही मागे हटले नाहीत.

आर्य समाजाने अस्पृश्योध्दाराचे कार्य सुरू केले. शास्त्री पंडीत ब्राह्मण कुळात जन्मलेले मराठवाड्यातील एक कर्मठ कार्यकर्ते पं. गणपतराव वैद्य यानी एका हरिजन कन्येशी शांतीदेवीशी विवाह करून जातीयता, निर्मूलनास स्वत:-पासून प्रारंभ केला. पं. मनोहर लालजी, पं. शंकर देव विद्यालंकार हे जन्मत: हरिजन होते पण यानी ब्राह्मण कुळातील मुलींशी विवाह केले. अशाप्रकारे प्रत्यक्ष कृतीतून जातियता संपुष्टात आणण्याच्या दिशेने आर्य समाजाने पावले उचलली.[२०] गोरगरिबांना, महार, मांग यांना जीवनाचा, धर्माचा खरा अर्थ शिकविला व अशा कार्यामुळे आर्य समाजाविषयी पददलित जनतेच्या मनात ओढ निर्माण झाली.

आंतरजातीय विवाहाच्या संदर्भात मात्र सर्वच आर्य समाजी कार्यकर्ते कृतीशूर असल्याचे दिसत नाही परंतु आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन देऊन सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी मात्र त्यांनी प्रयत्न केले. पं. डी.आर.दास हे पूर्वाश्रमीचे ब्राह्मण असून त्यानी आपल्या मुलांमुलींचे विवाह वैदिक पध्दतीने लावले असून एका मुलाचा अपवाद वगळता सर्व आंतरजातीय विवाह केले आहेत. हे विवाह घडवून आणत असताना त्याना सनातनी मंडळीकडून तसेच नातलगाकडूनही विरोध सहन करावा लागला. त्यानी जातीपातीची सर्व बंधने तोडून आर्य समाजाचे सामाजिक समतेचे कार्य चालू ठेवले, मराठवाड्यातील आर्य समाजाचे एक खंदे पुरस्कर्ते म्हणून लोक त्यांना ओळखतात. आजही ते आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देतात.[२१]

निलंग्याचे शेषरावजी वाघमारे (स्व. आनंदमुनीजी) यानीही आपल्या सर्व मुलामुलींचे विवाह आंतरजातीय पध्दतीने केले आहेत. त्या विवाहांना परक्यांचा विरोध होता. इतकेच नव्हे तर त्यासाठी त्याना वाळीत टाकण्यात आले होते.

' आर्य समाज जन्मावरून जाती पाती मानत नाही, गुणकर्मस्वभावानुसार वर्णाश्रम व्यवस्था मानतो ' हा सिध्दांत श्री. शेषरावजींनी स्वत: जीवनात कृतीशीलतेने आचरणात आणून समाजापुढे महान आदर्श ठेवला. ज्या काळात जातीपातीची बंधने भयंकर होती तेव्हा त्यानी स्वत:च्या कन्येचा विवाह अन्याजातीच्या मुलां-बरोबर केला, व महान क्रांती घडवून आणली. ब्राह्मण समाजत्यांच्या विरूध्द झाला. परंतु शेषरावजीनी त्याची पर्वा केली नाही. शेवटी ब्राह्मण समाजालाच त्याना शरण जावे लागेले.[२२]

' तुळजापूर येथील जुने व निष्ठावंत आर्य समाजी कार्यकर्ते श्री.देवीदासराव पेंदे (आर्य) वर्तमान देवमुनि वानप्रस्थी याना आर्य समाजाने आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन दिले. परंतु किती आर्य समाजी कार्यकर्त्यांनी आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार केला ? असा प्रश्न विचारला असता ते म्हणाले की, शंभर टक्के कार्यकर्ते यात सहभागी आहेत असे म्हणता येणार नाही परंतु ४० ते ४५ टक्के लोकांनी याचा पुरस्कार केला. त्यानी आपल्या मुलींचा आंतरजातीय विवाह करून मराठा समाजाचा रोष पत्करला आहे. आजही आर्य समाज मंदिर तुळजापूरच्यावतीने अनेक आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन दिले जाते.[२३]

मराठवाडयातील आर्य समाजी शाखांमधूनही आंतरजातीय विवाह घडवून आणले जात असत. ब-याचवेळा हे विवाह गुप्तपणे घडवून आणले जात. वैदिक पध्दतीने हे विवाह घडवून आणत असताना विवाहास परस्परांची संमती असणे अत्यंत महत्वाचे असते. आर्य समाजी उपदेशक अथवा इतर पंडीत गण यांच्यामार्फत असा विवाह घडवून आणण्यात येतो. इ.स. १८९१ ते १९४८ पर्यन्तच्या काळात सर्वत्र आंतरजातीय विवाह रूढ होऊ शकले नाहीत. तथापि आंतरजातीय विवाहाच्या सहाय्याने सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा व जातीयता नष्ट करण्याचा प्रयत्न आर्य समाजाने केला हे नि:संशय.

पं. विरभद्र मल्ल (येडशी गुरुकुल), श्री. बोलाराम शर्मा औरंगाबाद यानी आंतरजातीय विवाह करून नवयुवकांच्या पुढे आदर्श ठेवला.[२४] याशिवाय श्री. उत्तममुनीजी वानप्रस्थी यानी धर्माबाद (जि. नांदेड) येथून दि. ११-८-१९४८ रोजी पाठविलेल्या माहितीनुसार इ.स. १९४८ पूर्वी पुंजाजी कठाळे (नांदेड), विरभद्र आर्य (औराद शहाजनी), ज्ञानराव साळुंखे (उस्मानाबाद), वसंतराव म्हैसकर (औरंगाबाद), शहाजी सौताडेकर (लातूर), पं. ज्ञानेंद्र शर्मा (औरंगाबाद), पं. नरदेव स्नेही (औरंगाबाद), प्रल्हादजी पंडीत, नरसिंगराव मदनसुरे (चिंचोली) वामनराव जमादार (बीड), नंदलाल शर्मा, (नांदेड) इ. आर्य समाजी कार्यकर्त्यांनी आंतरजातीय विवाह केल्याचा निर्देश पं. उत्तममुनी वानप्रस्थी यानी आपल्या पत्रात केला आहे.[२५] कदाचित प्रत्यक्षात यापेक्षाही जास्त आंतरजातीय विवाह झाले असतील. आर्य समाज आंतरजातीय विवाहाचा पुरस्कर्ता होता हेच यावरून दिसून येते.

आर्य विवाह विधेयक :

१७ फेब्रुवारी १९२६ मध्ये स्वामी श्रध्दानंदांनी मिश्र विवाहास संमती देणाऱ्या आर्य विवाह बिलाचे कायद्यात रूपांतर व्हावे असा प्रस्ताव मांडला. परंतु काही काळाने तो प्रस्ताव बारगळला. तेंव्हा श्री. घनश्याम सिंह गुप्ता यानी हा प्रस्ताव असेंब्लीपुढे ठेवला. ते मध्यप्रदेश आर्य प्रतिनिधीचे असेंब्ली सदस्य होते. बऱ्याचशा वादावादी नंतर २० मार्च १९३७ रोजी हा प्रस्ताव पास झाला. ब्रिटिश हिंदुस्थानमधील हा प्रस्ताव पं. दत्तात्रय प्रसाद वकील (हलीखेड) यानी नवा मसुदा तयार करून श्री. वेंकटरंगा रेड्डी, अॅडव्होकेट, यांचेमार्फत हैद्राबाद सरकारपुढे मांडला. या प्रस्तावास हैद्राबाद राज्यातील तसेच मराठवाड्यातील आर्य समाजाच्या सर्व शाखांनी आपला पाठिंबा दिला. परंतु निजाम सरकारने मात्र हे आर्य विवाह बिल पास केले नाही. उलट आंतरजातीय विवाहावर प्रतिबंध लादून सामाजिक सुधारणेच्या कार्यांत अडथळे निर्माण केले. हैद्राबाद शिया राज्य आहे. येथे या संप्रदायाशी संबंधित मोहरम चा उत्सव मोठ्या निष्ठेने साजरा केला

जातो. या प्रसंगी शिया लोक आपले पहिले खलीफा (धर्मगुरू) हजरत अली आणि त्यांचे साथीदार यांच्या निधनाचा शोक साजरा करतात. हैद्राबाद राज्यात अशा प्रसंगी हिंदूंनी कोणत्याही विवाहाचे आयोजन करू नये.[२६] अशा विवाहावर प्रतिबंध लावून हिंदूंची मुस्कटदाबी करण्यात आली. आर्य विवाह बिलाची अंमल-बजावणी झाली असती तर संस्थानातील व पर्यायाने मराठवाड्यातील आर्य समाज सुधारणेचे एक पाऊल पुढे गेले असते.

<u>आर्य वीर दल (१९३८)</u> :

सार्वदेशिक सभेस गरज भासल्यावरून आर्य वीर दलाची उभारणी करण्यात आली. त्यानुसार आर्य समाजाच्या सर्व शाखांना सूचना देण्यात येऊ लागल्या. तसेच आर्य वीर दलातील सभासदांना शिक्षणासाठी उपदेशकही नेमण्यात आले. ' आर्य वीर दळ ' उभा करण्या पाठीमागे आत्मसंरक्षण हा हेतू होता. कासिम रझवीच्या नेतृत्वाखाली रझाकारांच्या सशस्त्र चळवळीने हैद्राबाद राज्यात धुमाकूळ घातला होता. तेंव्हा रझाकारांच्या चळवळीला प्रत्युत्तर देण्यासाठी आर्य समाजाला ' आर्य वीर दल ' स्थापन करावे लागेले. भाई बंसीलाल यांच्या नेतृत्वाखाली हे दल बार्शीच्या सीमावर्ती भागामध्ये कार्य करू लागले. दलामुळे जातीयतेचा विषारी प्रचार, जुलूम व अत्याचार याला प्रतिकार करून समाजाचे रक्षण, आर्य वीर दलाचे मुख्य उद्दिष्ट होते. किल्ले धारूर, घाटपिंपरी, नांदेड, उदगीर, निलंगा, हिंगोली, लातूर, उस्मानाबाद इ. अनेक ठिकाणी दलाच्या शाखा उघडण्यात आल्या होत्या. इ.स. १९४९ पर्यन्त आर्यवीर दलाच्या एकूण २५० शाखा स्थापन झाल्या होत्या. श्री. माणिकरावजी सोनवणे (अहमदपूर) हे आर्य वीर दलाचे संचालक होते. आर्य वीर दलाच्या रचनेमुळे मुस्लीम जातीयवादी शक्तींना आणि त्यांच्या हिंदुधर्मीयांच्या वरील अत्याचाराला पायबंद बसला. त्यामुळे समाजातील कार्यकर्त्यांचे मनोधैर्य वाढीस लागले. आर्य वीर दलाकडून निजाम सरकारकडे विविध मागण्याही मांडण्यात आल्या. आर्य वीर दलाच्या सहाय्याने

हिंदूच्या उत्सवामध्ये प्रचाराचे कार्य केले जाते. उदा. औंढा नागनाथ, परळी वैजनाथ येथील उत्सवामध्ये हे कार्यकर्ते वैदिक धर्माचा प्रसार व प्रचार करून लोकांच्या मनात वैदिक धर्माविषयीची आत्मियता दृढ करीत असत. याशिवाय विविध ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या आर्य संमेलनामध्ये आर्य वीर दलाचे कार्यकर्तेही सहभागी होत असत. ` आर्य वीर दल ` ही आर्य समाजातील नवयुवकांची आत्मसंरक्षणार्थ स्थापना करण्यात आलेली एक संघटना होती. आजही अनेक आर्य समाजी शाखां-मधून आर्य वीर दलाचे कार्य चालू आहे.

<u>पिडीतांना सहाय्य</u> :

हैद्राबाद संस्थानांतर्गत आर्यसमाजाच्या मराठवाडा, तेलंगण, कर्नाटक इ. प्रदेशातील शाखांनी समाजातील सर्वसामान्य लोकांच्या दु:खामध्ये सहभागी होऊन त्याना सहाय्य केले. आर्य समाजाच्या आचार-विचारातच गरीब व पीडित याना सहाय्य, सहकार्य करण्याची भूमिका होती. हैद्राबाद येथील मुसा नदीला पूर आला व अचानक आलेल्या या पुरामुळे जीवित व वित्ताची हानी झाली तेंव्हा आर्य समाजाने पूरग्रस्तांना आर्थिक व इतर सहाय्य दिले. श्री.पं.डी.आर. दास, लातूर व श्री.पं. दिगंबररावजी लाटकर, प्रधान, आर्य समाज, लातूर यांनी तालुकेदार तसेच श्री. ग्रीसन साहेब यांची भेट घेऊन गोरगरीबांच्यापुढे निर्माण झालेल्या अन्नधान्या-च्या स्थितीबाबत वास्तववादी चित्र उभे केले. तेव्हा मात्र गरीबांना काही प्रमाणात सोयी उपलब्ध होऊ शकल्या.[२७] दिनदलितांचे अश्रू पुसून त्यांचा कैवार घेणा-यात आर्य समाज अग्रेसर राहिला. श्री. माणिकरावजी, प्रधान, आर्य समाज, अहमदपूर (सध्या जि. लातूर) यानी तालुकेदारास व फजलुल्लासाो., डायरेक्टर, पुरवठा विभाग याना भेटून आसपासच्या गावामधील लोकांना अन्नधान्य उपलब्ध व्हावे म्हणून प्रयत्न केले. त्यांनी केलेल्या प्रयत्नामुळेच गोरगरीबांसाठी अन्न वाटपाची व्यवस्थाही त्यांच्यावर सोपविण्यात आली. गरीबांना मदतीचा हात देण्यात

संस्थानातील व पर्यायाने मराठवाड्यातील आर्य समाज आघाडीवर होता हे वरील उदाहरणावरून स्पष्ट होते.

श्री. माणिकचंदजी राठोड, शिवनारायणजी, नारायणदासजी मोदी, पन्नालालजी नेत्रवैद्य, शंकररावजी, बाबूलालजी राठोड इ. हिंगोलीच्या आर्य समाजाच्या संस्थापक सदस्यांनी निजामी अत्याचार पीडितांना सहाय्य दिले. इ.स. १९४५-४६ मध्ये अनेक जिल्हात विषूचिका (हैजा) आणि ग्रंथीज्वर (प्लेग) हे भयानक रोग पसरून अनेक कुटुंबे संकटात सापडली होती. तेंव्हा आर्य समाजामार्फत गरजूंना औषधोपचार करण्यात आले. या संदर्भात श्री. डी.आर. दासजी (लातूर) श्री. बापूरावजी जगदाळे मास्तर (उस्मानाबाद) यानी उल्लेखनीय कार्य करून रोगग्रस्तांना जीवदान दिले.

<u>निर्वासीतांना सहाय्य</u> :

इ.स. १९४७-४८ हे वर्ष आर्यसमाजाच्या दृष्टीने महत्वाचे होते. कारण या वर्षापासूनच आर्य समाजावर अधिकाधिक धार्मिक व सामाजिक बंधने सरकारकडून घालण्यात येऊ लागली. तेंव्हा मात्र आपले सामाजिक सुधारणेचे कार्य करीत असतानाच समाजास अशा अनेक संकटांना व अत्याचारी घटनांना तोंड द्यावे लागले. ब्रिटिशांच्या कुटील नीतीमुळे निजामाने हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यात सहभागी होणार नाही अशी घोषणा केली. त्याबरोबर रझाकार, मजलिसे इत्तेहादूल इ. मुस्लीम जातीयवादी संघटनांनी हिंदू जनतेवर अत्याचार सुरू केले. लोकांच्या मनामध्ये एकच भीतीचे वातावरण निर्माण झाले. खून, जाळपोळ, अत्याचार यांचेच साम्राज्य निर्माण झाले. तेव्हा मराठवाड्यातील हजारो हिंदू लोक निर्वासित होऊन जीव वाचवण्यासाठी भारतीय संघराज्यात आश्रयार्थ निघून गेले. आर्य समाजाने निर्वासीतांच्यासाठी ब्रिटिश प्रदेशात ठिकठिकाणी छावण्या उभ्या करून त्यांच्या मनामध्ये धीराची भावना निर्माण करण्याचे तसेच त्यांना जीवदान देण्याचे कार्य केले.

इ.स. १९४७ मध्ये हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसने मुक्ती आंदोलन चालू केले. तेंव्हा निजाम सरकारने धरपकडीचे सत्र आरंभले. त्यामध्ये आर्य समाजी कार्यकर्त्यांचाच अधिक भरणा होता. निजाम सरकारने हैद्राबाद राज्याबाहेरील अनेक मुसलमानांना विविध प्रलोभने दाखवून राज्यात येण्याबाबत त्याना प्रोत्साहन दिले. तर अनेक हिंदूंनी राज्य सोडून मुंबई प्रांतातील सोलापूर, अक्कलकोट, पंढरपूर,पुणे, उमरखेड, बार्शी, मनमाड इ. अनेक ठिकाणी जाऊन आपले तळ ठोकले. येणाऱ्यामध्ये आर्य समाजी कुटुंबे व युवकांचाही समावेश होता. उमरखेड येथील दोन हजार निर्वासीतांची व्यवस्था आर्य समाजाचे मंत्री बंसीलालजी व्यास यानी केली. त्या सर्वांची जेवण व्यवस्था करण्यात आली होती. तसेच व्यवस्थेसाठी एक `आर्य रक्षा समिती` स्थापन करण्यात आली. त्यामध्ये मराठवाडयातील अॅडव्होकेट शेषरावजी वाघमारे (निलंगा), श्री.पं.डी.आर. दास (लातूर), श्री. दिगंबररावजी लाटकर (लातूर) तसेच श्री. मनोहरलालजी, श्री. दशरथरावजी इ. चा समावेश होता.[२८] त्यानी कॉंग्रेसचा लढा तीव्र करण्याचा प्रयत्न केला तसेच हैद्राबाद राज्यातून येणाऱ्या कुटुंबियांच्या राहण्याच्या व्यवस्थेचा व संरक्षणाचा बंदोबस्त केला. पुणे येथे येणाऱ्या निर्वासीतांची व्यवस्था आर्य समाज, पुणे (नाना पेठ) यानी केली. तेथे चार ते पाच हजार निर्वासीतांची व्यवस्था करण्यात आली. श्री. जयप्रकाश नारायण यानी १६ नोव्हेंबर, १९४७ ला सदर निर्वासीत छावण्यास भेट दिली होती.

सोलापूर येथे पं. मनोहरलालजी (अहमदपूर), पं. बंसीलाल व्यास हे व्यवस्थापक होते. तर पंढरपूर येथे श्री. डी.आर. दास (लातूर) श्री.नामदेवराव चामले (लातूर) श्री. दिगंबररावजी लाटकर (लातूर) तर मध्यप्रदेशामध्ये श्री. कर्मवीरजी (उदगीर) इ. मराठवाडयातील अनेक आर्य समाजी कार्यकर्त्यांनी निर्वासीतांचे अश्रू पुसण्याचे कार्य केले.[२९] याशिवाय विजापूर, बुलढाणा, अमरावती, वासिम, चांदा, पुसद, विजयवाडा इ. अनेक ठिकाणी छावण्या उघडण्यात आल्या होत्या. मराठवाडयातील आर्य समाजाने सोलापूर, बार्शी येथील छावण्यामध्ये

मोफत औषधोपचाराची व्यवस्था केली होती. हैद्राबादमधील सर्व स्थितीचे वर्णन भारतामधील सर्व आर्य समाजी दैनिक, साप्ताहिकांमधून बातम्यांच्या रूपाने प्रसिध्द करण्यात आले. हैद्राबाद संस्थानातील एक शिष्टमंडळ दिल्लीस सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभेकडे गेले व त्याने राज्यातील अत्याचारी स्थितीची माहिती सभेस दिली. त्यानुसार पं. महात्मा आनंद स्वामीजी महाराज यांनी हैद्राबाद राज्याच्या सीमावर्ती प्रदेशात दौरा केला. त्यांनी समाजाचा प्रचार करून निजामी सत्ताधीशांचे अत्याचार व आर्य समाजाचे कार्य याचे वास्तववादी चित्रण केले. तसेच त्यानी लोकांना अत्याचारी राजवटी विरूध्द निर्धाराने उभे राहण्याचे आवाहन केले. पोलिस कारवाईनंतर ते मराठवाड्यातील लातूर येथे आले व तदनंतर पंजाबला परतले. मराठवाड्यातील आर्य समाजाने केलेले सामाजिक कार्य अनेकांना जीवदान देणारे ठरले.

<u>आर्य कुमार सभा</u> :

आर्य समाजाच्या सामाजिक जागृतीमध्ये आर्य कुमार सभेचा वाटा `अभिचार दल,`` आर्य रक्षक दल` इ. प्रमाणेच महत्वाचा आहे. इ.स. १९३० ते १९३२ या काळात सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभेचे कामकाज उदगीरमधूनच पाहिले जात होते. श्री.पं. बंसीलालजी वकील हा मराठवाड्यातील आर्य समाजाची सिंहगर्जना करणारा कार्यकर्ता होता. आर्य समाजाच्या कार्यामुळे अनेकजण आर्य समाजाच्या चळवळीमध्ये सहभागी झाले होते. १० ते १५ वर्षे वयोगटातील मुले देखील आपल्या नातेवाईकांच्या बरोबर सत्याग्रह चळवळीमध्ये सहभागी झाली होती. ` आर्य कुमार सभा ` ही आर्य समाजाची प्रचार व जागृती करणारी प्रभावी शाखा होती. मराठवाड्यातील हजारो युवकांनी या सभेमध्ये सहभाग घेतला होता. इतकेच नव्हे तर बरेच जण इ.स. १९२९ मधील आर्य कुमार सभेच्या परिषदेस सोलापूर येथे उपस्थितीत राहिले होते. इ.स. १९०९ मध्ये डॉ. केशवदेव शास्त्री यांच्या नेतृत्वाखाली ही सभा प्रथम स्थापन करण्यात आली. वर्षाच्या शेवटी सभेची समाप्ती परिषदेच्या रूपाने होत असे. त्यामध्ये ईश्वर, वैदिक धर्म आणि स्वदेशी या विषयी प्रेम व भक्ती निर्माण केली जात असे. तसेच धार्मिक परीक्षाही घेतल्या जात असत.

युवकांमध्ये राष्ट्रीय व सामाजिक जागृती निर्माण करणे हा या पाठीमागचा हेतू होता. किल्ले धारूर, नांदेड, लातूर, उदगीर इ. ठिकाणच्या आर्य समाजाच्या शाखांमधून वरील सभेचे कार्य चालत असे.

इ.स. १९३८ मध्ये आर्य समाज, लातूरच्यावतीने आर्य कुमार सभा स्थापन केली. पुढील दहा वर्षे या सभेचे कामकाज चालत राहिले. नंतर मात्र त्यामध्ये शिथिलता येऊन हे कार्य बंद पडले.[३०] आर्य समाज किल्ले धारूर येथे पं.अविमारजी विद्यार्थ्यांना आर्यकुमार परिषद, अजमेर येथे होणाऱ्या परीक्षेचा अभ्यासक्रम विनावेतन शिकवित होते. आर्यकुमार सभेमध्ये सहभागी होणाऱ्या युवकांना शारीरिक शिक्षणही देण्यात येत असे. अनेक उत्साही तरूण या संघटनेमध्ये सहभागी झाले होते.

<u>व्यायामशाळांची उभारणी</u> :

हिंदूंच्या धार्मिक विकासा बरोबरच त्यांच्या शारीरिक विकासाकडे देखील आर्य समाजाने लक्ष दिले आहे. त्यानुसार प्रत्येक आर्य समाज शाखेवर व्यायाम शाळांची उभारणी करण्यात येत होती. तथापि इतर आदेशा बरोबरच निजाम सरकारने व्यायाम शाळांच्यावरही बंदी आदेश लागू केले. कारण व्यायामशाळांतूनच हिंदूंची आत्मसंरक्षणार्थ आवश्यक बलोपासना चालत असावी अशी शंका निजामास आली. निजाम सरकारच्यावतीने " हैदराबादमे आर्य समाज " ( Arya Samaj in Hyderabad ) नावाची जी पुस्तिका प्रकाशित करण्यात आली होती त्यामध्ये व्यायाम शाळेबाबत आक्षेप घेण्यात आला होता. तो असा " इन आखाडों का उद्देश अधिक काल तक व्यायाम नही रहा था, वरन् सांप्रदायिक युध्द करने वा अपनी रक्षा के लिए सदस्यों को काबिल बनाया था ।"[३१] यावरून आर्य समाजास आत्मसंरक्षणाचा हक्क नाही असाच सत्ताधीशांचा गृह असावा असे दिसते. हिंदूनी किंवा आर्यांनी असे आत्मसंरक्षण करणे निजामी सत्ताधीशांच्या कायद्यात बसत नव्हते. तेंव्हा त्यांनी काही ठिकाणी आखाडे बांधण्याचे व सुरू करण्याचे दिलेले

आदेश परत घेतले असे आदेश कासारशिरशी, मुधौल बुर्जुग, नलगीर आर्य समाजाचे मंत्री गंगारामजी आर्य व भगवानराव आर्य याना ही देण्यात आले होते. यावरून आर्य समाज बलिष्ठ होऊ नये तसेच त्यांच्यात सामाजिक संरक्षणाची व रझाकारांना प्रतिकार करणारी ताकद निर्माण होऊ नये असा निजामाचा हेतू होता हे स्पष्ट होते. अखेर इ.स. १९३९ मध्ये निजामाने आर्य समाजाच्या मागण्या मान्य केल्यानंतर लातूर, औरंगाबाद, हिंगोली, परभणी, जालना, निलंगा, उदगीर इ. अनेक ठिकाणी आर्य समाजाने व्यायाम शाळा स्थापन केल्या. आर्य वीर दल संघटित करण्यासाठी व वैदिक धर्म प्रचारासाठी व्यायाम शाळा हे आर्य समाजाचे माध्यम होते. व्यायाम शाळा व आखाडे याबाबत आर्य समाजाने फार मोठा पुढाकार घेतला. दसरा, गणेशोत्सव, हिंदु-मुस्लीम दंगली अशा काळात हे कार्यकर्ते स्वयंसेवक म्हणून काम करीत. लातूरची जैन मंदिर व्यायाम शाळा (१९३४), बलभीम व्यायाम शाळा, रामलिंगेश्वर व्यायाम शाळा, आर्य समाज व्यायामशाळा (सर्व लातूर), आर्य समाज व्यायाम शाळा, महमदपूर (१९४२), व्यायाम शाळा, अंधोरी, अहमदपूर (१९४५), आर्य समाज व्यायाम शाळा, येलदरी (१९४६), आर्य समाज व्यायाम शाळा (उदगीर) इ. आर्य समाजाच्या कार्यात आघाडीवर होत्या. परभणी येथील दंगल, उस्मानाबाद व लातूरमध्ये जैन दिंडीवर झालेले हल्ले, हिंदू उत्सवावर निजामाची असणारी वक्रदृष्टी इ. मधून आर्य समाजाचे आखाडे व व्यायाम शाळा यांची गरज निर्माण झाली.

<u>तुळजापूरचे नमस्कार मंडळ</u> :

मीर उस्मान अली यांच्या धार्मिक धोरणामुळे आर्य समाजाच्या सामाजिक सुधारणेच्या कार्यात अनेक अडसर उभा रहात होते. जेंव्हा व्यायाम शाळांच्यावर बंदी घालण्यात आली तेंव्हा त्याला पर्याय म्हणून नमस्कार मंडळे गुप्तपणे कार्य करू लागली. उस्मानाबाद जिल्हा आरंभापासूनच आर्य समाजाच्या कार्यात

मराठवाड्यात आघाडीवर होता. श्री. विश्वंभरराव जाधव, श्री. देविदासराव पैंदे तसेच श्री. कृष्णाथराव जगताप गुरूजी यानी तुळजापूर येथे नमस्कार मंडळाची स्थापना करून युवकांच्या मनामध्ये प्रतिकार बुध्दी जागृत केली. नमस्कार मंडळामध्ये सुरवातीच्या काळात फारच थोडे युवक सहभागी झाले होते. कारण अशा तरूणांच्या मागे निजामी पोलिसांचा ससेमीरा असावयाचा. मंडळात सकाळी सूर्य नमस्काराच्या रूपाने व्यायाम करावयाचा परिपाठ होता. हा व्यायाम जवळपास दोन तास चालत असे. यामध्ये चारित्र्यवान, निर्व्यसनी युवकांचा सहभाग असे. दररोज याबाबतची हजेरी पत्रकेही ठेवली जात असत. ताजुद्दीन नावाच्या एका इस्लाम युवकांचा नमस्कार मंडळात समावेश होता. व्यायाम शाळेऐवजी अशा पध्दतीने व्यायाम करून आत्मरक्षण व समाज रक्षणाची कामगिरी आर्य समाजाच्यावतीने पार पाडण्यात आली.[३२]

स्त्री जागृतीचे कार्य :

आर्य समाजाच्यावतीने विविध ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या संमेलनामधून महिलांच्यामध्ये जागृती व्हावी यासाठी प्रयत्न करण्यात आले. त्यामध्ये मराठवाड्यातील श्रीमती सुशिलादेवजी आर्य, (औराद शहाजनी) श्रीमती सवितादेवीजी आर्य (जालना), श्रीमती रूक्मिणीदेवी शर्मा (जालना) श्रीमती सुमित्रादेवजी (लातूर) इ. अनेक स्त्रियांनी सहभाग घेतला होता. मुलींना नोकरी-साठी न शिकविता त्याना गुरूकुल शिक्षणासाठी पाठवणे, आंतरजातीय विवाहासाठी मुलांच्या मनामध्ये जागृती निर्माण करणे, स्वसंरक्षणासाठी स्त्रियांनी स्वत:जवळ शस्त्र ठेवणे, मुलांच्या मनावर वैदिक धर्माचे संस्कार बिंबवणे इत्यादी स्त्रियांच्यात जागृती निर्माण करण्याचे कार्य आर्य समाजाने केले. इ.स. १९४३ मध्ये निजामाबाद तसेच जालना येथील आर्य महासंमेलनामधून स्त्री जागृतीचे कार्य करण्यात आले. वरील आर्य समाजी महिलांनी मराठवाड्यात स्त्री जागृतीच्या कार्यात भाग घेऊन कार्यारंभ केला. हैद्राबाद संस्थानातील

स्त्रियांचा ब्रिटिश हिंदुस्थानच्या तुलनेने स्वातंत्र्य आंदोलनात किंवा सामाजिक कार्यात असणारा सहभाग कमी होता असे म्हणावे लागते. हैद्राबाद राज्यात मोगलाई होती. त्यामुळे स्त्रीयांना सामाजिक कार्यात सहभागी होण्यास ब-याच अडचणी निर्माण होत. इ.स. १९३७-३८ पासून मराठवाड्यातील हाताच्या बोटावर मोजण्या इतपत स्त्रियांनी सार्वजनिक कार्यात भाग घेतला. आर्य समाजाने स्त्रियांच्या मनामध्ये सार्वजनिक कार्याची प्रेरणा निर्माण केली. महाराष्ट्र परिषदेने इ.स. १९३८ मध्ये संयोजित केलेले महिला संमेलन, नांदेड, परभणी, औरंगाबाद इ. ठिकाणची शिबीरे यांचा स्त्रियांच्यामध्ये संघटित शक्ती निर्माण करण्यासाठी उपयोग झाला.

जातियता निर्मूलनाचे कार्य :

आर्य समाजामध्ये सर्व जाती धर्माचे लोक समाविष्ट होते. सहभोजना-सारखे कार्यक्रमही आर्य समाजाच्यावतीने आयोजित करण्यात आले होते. समाजपुरस्कृत आंतरजातीय विवाह पध्दती हे जातियता निर्मूलनाचे एक महत्वपूर्ण पाऊल आहे. आर्य समाजाने जातीपातीची बंधने झुगारून देऊन आपण सर्व एक आहोत ही भावना रुजवली. म्हणूनच हैद्राबाद राज्यात व पर्यायाने मराठवाड्यात आर्य समाजाचा मोठया प्रमाणात प्रसार झाला. आर्य समाज विशिष्ट जातीचा नसून ती एक समुदायाची चळवळ आहे. म्हणूनच समाजातील सर्व थरातील लोकांना आर्य समाजाने दीक्षा देऊन जातीयता निर्मूलनास हातभार लावला.आर्य समाजाची दीक्षा कोणत्याही जातीच्या अथवा पंथाच्या लोकांना घेता येत होती. मराठवाड्यातील लोक निजामी अत्याचाराला सक्तीच्या धर्मांतराला कंटाळले होते. अशावेळी आर्य समाजाची जातीयते विरूध्दची चळवळ सर्वांनाच दिलासा देणारी ठरली.

विधवा विवाहास चालना :

पंडीता रमाबाई, महर्षि धोंडो केशव कर्वे, म. फुले, तसेच इतर अनेक समाज सुधारकांनी १९ व्या शतकामध्येच विधवा विवाहास चालना देण्यासाठी

विविध मंडळांची स्थापना केली होती. हिंदू समाजातील विधवा स्त्रियांची दु:खे पाहून समाज सुधारकांची मने हेलावून जात असत. बालविवाहाच्या प्रथेमुळे अनेक बालिकांवर ऐन उमेदीच्या काळात दुर्धर प्रसंग यावयाचे. विधवा स्त्रियांची दु:खे दूर होऊन त्यांना समाजात मानाने व सन्मानाने जगता यावे यासाठी आर्य समाजाने १९३४ पासून प्रयत्न केले. आर्य प्रतिनिधी सभेचे प्रधान न्यायमूर्ती केशवराव कोरटकर यांनी हैद्राबाद कायदे मंडळात इ.स. १९३० मध्ये विधवा विवाह बिल मांडले परंतु त्यांच्या मृत्युनंतर त्यावर फारशी चर्चा झाली नाही. त्यांचे सुपुत्र पं.विनायकरावजी विद्यालंकार हे इ.स. १९३४-३५ मध्ये कायदे मंडळाचे (धारा सभा) सदस्य म्हणून निवडले गेले. तेंव्हा श्री.राजा बहादूर राव विश्वेश्वरनाथजी, सभासद ज्युडिशल कमिटी यानी हे बिल पुन्हा उपस्थित केले. तेंव्हा पं.विनायकराव विद्यालंकार यांच्या प्रयत्नाने हे बिल पास झाले. त्यासाठी श्री.राजा बहादूर राय विश्वेश्वरनाथ, श्री.राजा बहादूर श्री. राम धोंडी राजजी, श्री. राजा बहादूर व्यंकट रामा रेड्डीजी व श्री. नवाब मीर्झा यार जंग बहादूर इ. सर्वांच्या विशेष सहकार्याने ते बिल पास झाले. अनेकांचा विरोध असूनही १५ आजूर सन १३४४ फसली मध्ये अखेर बिल पास करण्यात आले. आर्य समाजाच्या सामाजिक सुधारणेच्या पर्वात हे एक नवे पाऊल होते.[३३] आर्य समाज मोमिनाबाद (अंबाजोगाई) च्या वतीने ७ विधवा विवाह, ७ पुनर्विवाह, २ आंतरजातीय विवाह करण्यात आले. विधवा विवाहाच्या बाबत आर्य समाजाच्या वतीने प्रोत्साहन देण्यात आले. आर्य समाज अंबाजोगाई बरोबरच मराठवाड्यातील इतर आर्य समाजी शाखांमधूनही विधवा विवाहास चालना देण्यात आली आणि असे विवाह घडवून आणण्यात पुढाकार घेण्यात आला. विधवा विवाह किती झाले यापेक्षा आर्य समाजाच्यावतीने अशा प्रथांना चालना मिळाली हा भाग महत्वाचा आहे.

बाल विवाह प्रथेस विरोध :

हिंदूंच्या अनेक अनिष्ठ प्रथेपैकी बाल विवाह ही एक होय. सामाजिक रूढी आणि परंपरेला व अंधश्रध्दांना तडा देण्याचे कार्य अनेक सामाजिक सुधारकांनी व संस्थांनी केले. पण २० व्या शतकात अशा प्रथांना विरोध करण्याची भरीव कामगिरी हैद्राबाद राज्यातील आर्य समाजाने केली. निजामी अत्याचाराविरूध्द आर्य समाजास सातत्याने संघर्ष करावा लागत होता. त्यामुळे ब-याचवेळा अनेक सामाजिक प्रथांना प्रोत्साहन दिले जात असे. इ.स. १९३० मध्ये श्री.एम.नरसिंगराव संपादक ` रैयत ` यानी बाल विवाह प्रथा बंदी बाबत विध्येयक मांडले तेंव्हा आर्य समाजाने त्या बिलाचे संपूर्ण समर्थन केले. इतकेच नव्हे तर त्यासाठी अनुकूल जनमत तयार करण्याचा आर्य समाजाने प्रयत्न केला. पण निजाम सरकारने मात्र सनातनी लोकांचा याला विरोध आहे हे निमित्त पुढे करून हे बिल मंजूर केले नाही.[३४]

आर्य समाजाने बहुविवाह, जरठ विवाह, पडदा पध्दती इ. अनेक विधातक सामाजिक रूढींवर प्रहार केला तर प्रौढ विवाहास चालना दिली. १६ वर्षांच्या आत मुलीचे व २५ वर्षांच्या आत मुलांचे लग्न करू नये असा आर्य समाजाचा शिरस्ता होता. यावरून सामाजिक सुधारणेची आर्य समाजाची पुरोगामी दृष्टी स्पष्ट होते.

मराठवाड्यातील आर्य समाजाने सामाजिक सुधारणा, समाज जागृतीच्या कार्याबरोबरच इ.स. १९४१ मध्ये महात्मा गांधीजींची ७३ वी जयंती लातूर येथे हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसचे कार्यकर्ते सय्यद सीराजुल्ला तिरमीजींच्या अध्यक्षतेखाली साजरी केली.[३५] आर्य समाज हे समाजसुधार आंदोलन आहे. स्त्री शिक्षण प्रचारातही आर्य समाज अग्रभागी राहिला. सहस्त्रावधी स्त्रियां आर्य समाजाच्या स्फूर्तीने, प्रेरणेने आधुनिक शिक्षणाचा लाभ घेऊ शकल्या. आर्य समाज नुसता बोलघेवडा नव्हता तर बालविवाह, आंतरजातीय विवाह यांचा समर्थक राहिला. जातिभेद मोडून काढणारी ही महत्वपूर्ण संघटना आहे. आर्य समाजाने अपहृत स्त्रियांना नवजीवन प्राप्त करून दिले.[३६]

आर्य समाजातील कार्यकर्त्यांनी आपल्या कार्यातून सुधारणा चळवळीचे लोण सर्वत्र पसरविण्यास प्रारंभ केला. सुधारणेतून लोकजागृतीचे आणि राष्ट्रधर्माचे महत्व जनतेला पटू लागले होते. शुध्द वैदिक धर्माच्या प्रचारातून सुधारणा चळवळीची पार्श्वभूमी तयार होत होती. आर्य समाजानेच हैद्राबाद मुक्ती संग्रामाला सुधारणावादाचा आशय प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला.[३७]

धार्मिक सुधारणा :

निजामाच्या हैद्राबाद राज्यामध्ये इस्लाम धर्मियांखेरीज बाकी कोणालाच विशेषत: हिंदूंना कसलेच धार्मिक स्वातंत्र्य नव्हते. त्यांच्यावर अधिकाधिक निर्बन्ध लादण्याचे धोरण सरकारने स्विकारले होते. धार्मिक विधी, समारंभ, पाठशाळा, हवणकुण्ड, नगरकिर्तने, शास्त्रार्थ इ. वर पूर्णपणे निर्बन्ध लादण्यात आले होते. तर धार्मिक क्षेत्रात आर्य समाजास कसलेही सुधारणा कार्य करता येऊ नये म्हणून अमूरे मजहबी (धर्म खाते) स्वतंत्रपणे उघडण्यात आले होते. इ.स. १९३५-३६ पासून त्या खात्याने कार्यारंभ केला. तरीही धार्मिक सुधारणेच्या क्षेत्रात समाजाने महत्वपूर्ण कामगिरी केली. धार्मिक स्वातंत्र्यावर लादलेल्या बंधनामधूनच ही चळवळ सर्व जातीपंथाना एकत्रित घेऊन लढा देण्यास सज्ज झाली. मराठवाड्यात आर्य समाजाने शुध्दिकरणाच्या बाबतीत महत्वपूर्ण कार्य केले आहे.

सक्तीच्या इस्लामीकरणास विरोध :

हैद्राबाद सरकारची धार्मिक धोरणासंबंधी वेळोवेळी जी फर्माने, आज्ञापत्रे, हुकूम निघत त्याला ' अहकामे ' अमूरे मजहबी ' (धार्मिक खात्याचे हुकूम) म्हणत. ते हुकूम अत्यंत जाचक होते. त्यामुळे इस्लाम प्रचारक कसे सक्तीने धर्मांतर करीत असत आणि जाचक आज्ञा हिंदू धर्माला कशा हानिकारक असत याची कल्पना येते. ६ फेब्रुवारी १९३९ मध्ये ' इत्तेहादुल मुस्लीमीन ' संघटनेचा प्रमुख नवाब बहादूर यार जंग याचे सोलापूर येथे एक व्याख्यान झाले. त्यामध्ये तो म्हणतो, " कि

क्यामत के दिन मै हुजूर निजाम-उल्-मुल्का का दामन पकडूंगा और कहूँगा कि आपने काफिरों को क्यो बाकी रखा कि वह आज हमारी तकलीफ का वाइस हो रहे है।"[३८] हे एक फार मोठे इस्लामी प्रचारक होते. त्यांनी २० हजार हिंदूना सक्तीने मुसलमान केले होते.

" निजाम सरकारच्या धार्मिक खात्यातर्फे मुसलमानात धार्मिक सुधारणा घडविण्यासाठी पगारी प्रचारक नेमले जात. त्यांना वाईज म्हणत (वाज - प्रवचन, वाईज - प्रवचनकार) ते मुसलमानांना धार्मिक शिक्षण देत असत. पण त्याच बरोबर ते हिंदू धर्मात डोकावण्याचा प्रयत्न सुध्दा करीत असत. कळमनुरी (परभणी) तालुक्यात एक गाव आहे. तेथे हटकरी जमातीमध्ये विलक्षण प्रथा आहेत. या जमातीमध्ये मनुष्य मेला की एकाधा काझीला बोलाविण्यात येते. तो प्रेतावर विडयाचे पान आणि आडकित्ता धरून अडकित्याने पानाचे देठ तोडी. प्रेताचा सुंता झाला असा त्याचा अर्थ होई. यानंतर प्रताचे दर्ग्याच्या आवारात दफन करत असत. हा समाज हिंदुधर्मीय होता. वाईजने तेथे प्रवचन केले. तो हटकरींना म्हणाला, " अगर तुमको इस्लाम प्यारा है तो मुसलमान हो जाव, नही, तो मे मज्जूम (संधि) इसम (परंपरा) छोड दो।"[३९] अशा पध्दतीने हे प्रचारक हिंदूना इस्लाम धर्माकडे ओढण्याचे हरप्रकारे प्रयत्न करीत असत. हिंदूच्या विस्कळीतपणाचा ते जास्तीतजास्त फायदा घेत असत. तेंव्हा आर्य समाजाच्या चळवळीने इस्लामी करणाच्या प्रयत्नास प्रतिकार केला. सनातन्यांप्रमाणे ते गप्प न राहता धार्मिक हक्कांसाठी झगडत राहिले. अहमदपूर तालुक्यात एका विवाहित हिंदू स्त्रीने कुण्या मुसलमानाच्या नादी लागून इस्लाम धर्म स्विकारला. काझी समोर नेऊन तीचा निकाह लावण्यात आला. तेंव्हा काझीने त्या स्त्रीच्या हिंदू पतीस नोटीस पाठवली त्यामध्ये अमक्या अमक्या मुदतीच्या आत तुम्ही मुसलमान व्हा नाही तर कायदेशीर कारवाई करण्यात येईल अशी धमकी देण्यात आली होती. ही नोटीस आर्य समाजीस्टांच्या हाती लागली. त्यानी ती अनेक वृत्तपत्रांत प्रसिध्द करून निजाम सरकारच्या जबरदस्तीने धर्मांतर करण्याच्या मोहिमेचे स्वरूप स्पष्ट केले.

आर्य समाजाने अशा सक्तीच्या धर्मांतरास प्रखर विरोध केला. निजामी राज्यामध्ये जर आर्य समाजाची धार्मिक चळवळ नसती तर कदाचित हैद्राबाद राज्याच्या संपूर्ण इस्लामीकरणास फार वेळ लागला नसता.

नवाब बहादूर यार जंग यानी मागासवर्गीय हरिजनांना मुसलमान करण्यासाठी एक गुप्त पत्र पाठवले होते. इत्तेहादूल मुसलमीन ही संघटना म्हणजे दुसरी मुस्लीम लिगच. विषारी जातीयवादी प्रचार करणारी ती कडवी धर्म संघटना होती. नवाब बहादूर यार जंगने धार्मिक विभागाच्या हेड ऑफिसमधून नं. १०१ ता. २६ मेहर १३४५ फसली मध्ये एक गुप्त चिठ्ठी लिहिली होती. त्यामध्ये तो म्हणतो -

> " एच.इ.एम. निजाम राज्य में तबलीक के काम का पत्रों में प्रकाशित होना ठिक नही । इसमे तबलीक के काम में बाधा पडती है, इसलिये मै प्रेस को रिपोर्ट नही देता । मुझे भय है कि कुछ लोग अदूरदर्शी होकर तबलीग रिपोर्ट प्रकाशित होने को भेजे, आप उनपर निगरानी रखना, खास कर अछूतों में कई इलाकों में काम हो रहा है, ऐसी खबरे सर्वथा न छापी जाए । अच्छा हो कि इस पत्र को पढ कर फाड दे ।
>
> आपका
>
> बहादूर यार जंग[40]

वरील गुप्त परिपत्रकाची प्रत आर्य समाजाचे निष्ठावंत कार्यकर्ते बी. वेंकटस्वामी यानी पोस्टातून प्राप्त केली. आर्य समाजाने हे गुप्त षडयंत्र उघडकीस आणले. शुध्दिकरणाच्या सहाय्याने हे सर्व प्रयत्न हाणून पाडण्यात आले. अनेकांना इस्लाम धर्म सक्तीने स्वीकारण्यास भाग पाडले आणि ज्यांनी तो स्विकारला नाही त्याना तर ठार करण्यात आले. गुंजोटी (पायगा) येथील वेदप्रकाश उर्फ दासप्पा शिवबसप्पा हर्के याने मुसलमान होण्यास नकार दिला

तेंव्हा त्याला ठार करण्यात आले. उस्मानाबाद जिल्हातील गायकवाडी येथील मारुतीचा मुलगा लिंबाजी याला सक्तीने धर्मांतर करण्यासाठी मुसलमानांनी घेरले पण त्याने नकार दिला तेंव्हा त्याला बेदम मारण्यात आले.[४१] अशी एक ना अनेक उदाहरणे होती. इस्लामी प्रचारकांनी व सत्ताधीशांनी सक्तीचे धर्मांतर सुरु ठेवले. तेंव्हा आर्य समाजाने या विरुध्द आवाज उठवून त्यास प्रतिकार केला.

निजामी शासकाच्या सक्तीच्या धर्मांतराच्या धोरणावर भाष्य करताना श्री. वसंत पोतदार म्हणतात, " हिंदूना बाटविण्याचे प्रमाण शिस्तशीर चालू होते. कारण त्यासाठी सरकारचे सहाय्य व प्रोत्साहन होते. सरकारच्या वतीने तीनशे मौलवी पगार देऊन या कामावर नेमलेले होते. या चळवळीस ' तब्लीत ' व ' तंजीस ' चळवळी असे म्हणतात. निझामाने पगारी मौलवी नेमून हिंदु-मुसलमान समाजात शांतता राखली जावी म्हणून गावोगावी ' आमन कमिटयाही ' (शांतता कमिटी) नेमल्या होत्या. या आमन कमिटया म्हणजे सर्वांना दिसावे असे नाटक होते. पगारी मौलवी महारवाडयात नेहमी हिंडून अस्पृश्य लोकांना हिंदू विरुध्द चिथावणी देत असत. हे मौलवी मुसलमान गुंडानाही चिथावून सोडत.[४२] गोरगरीब हरिजनांना नोकरीचे आणि आर्थिक लाभाचे आमिष दाखवून निजामाचे मौलवी त्याना मुसलमान करीत असत. अनेक हरीजन वरील अमिषांना बळी पडत असत. हरिजनांचा आर्थिक मागासलेपणा, त्यांचे अज्ञान, तसेच इतर सवर्णांच्याबाबत त्यांच्या मनात असणारी चीड याचा मुसलमान प्रचारक फायदा घेत असत. परंतु आर्य समाजही एक अशी संघटना होती की जिथे सर्व जातीधर्मांच्या लोकांना प्रवेश होता. आर्य समाजाचे सामाजिक समानतेचे धोरण निजामी सत्ताधीशांच्या इस्लामीकरणाच्या धोरणास मिळालेला फार मोठा शह होता.

मुसलमान होण्यास नकार दिल्यामुळेच उदगीर, अहमदपूर, उस्मानाबाद येथील आर्य समाजी कार्यकर्त्यांवर प्रखर हल्ले करण्यात आले. या संदर्भात पोलिसांना

कळवले तर तक्रार ऐकणे तर दूरच पण उलट तक्रार करणारास धमकी दिली जात असे. तरीही आर्य समाजी कार्यकर्ते अशा सक्तीच्या धोरणाला तीव्र विरोध करीत.

शुध्दिकरण चळवळ :

आर्य समाजाच्या कार्यकर्त्यांनी सक्तीच्या धर्मांतराच्या धोरणा विरूध्द आघाडी उघडली. गेवराई, माजलगाव, उस्मानाबाद, लातूर अशा अनेक गावात आर्य समाजाने शुध्दी आंदोलन सुरू केले. जवळपास दहा हजार धर्मांतरीत हिंदूना पुन्हा वैदिक धर्मात आणले.[४३] हिंदु धर्माच्या कर्मठपणामुळे अशाप्रकारे धर्मांतर केलेल्या व्यक्तींना परत हिंदू धर्मात येण्यास वाव नव्हता. परंतु आर्य समाजाने शुध्दीकरणाची मोहिम उघडून ज्या हिंदूनी धर्मांतर केले आहे त्याना परत हिंदु धर्मात घेण्यास सुरुवात केली. त्यामुळे हिंदू धर्माचे पुनरूज्जीवन करण्याची फार मोठी कामगिरी आर्य समाजाने केली. मराठवाडयातील उस्मानाबाद व नांदेड या दोन जिल्हात फार पूर्वीपासून आर्य समाजाचा प्रभाव राहात आला आहे. आर्य समाजाची नांदेड, उमरी, धर्माबाद, कंधार, देगलूर आदी केंद्रे कार्यक्षम होती. याच जिल्हात इतेहादुल मुसल्मीनने धर्मांतराची फार मोठी मोहिम उघडली होती. त्याला शह म्हणून आर्य समाजाने शुध्दी मोहिम जोमाने चालवली. नांदेड जिल्हामधील कंधार येथे निजाम (मीर उस्मान अलाखाँ) याच्या जन्मदिवस उत्सव-प्रसंगी अनेक हरिजनांना बहादूर यार जंग याने मुसलमान केले होते. तेव्हा हरिजनांना हिंदू धर्मात प्रवेशाबाबत उपदेश केला जात होता. म्हणून श्री. यादवराव शंकरराव टेकरीकर, श्री. माधवराव घोंसीकर, श्री. पंडीत प्रल्हाद आणि त्यांच्या साथीदारांवर कायदा ९२ (धारा) अंतर्गत आरोप ठेऊन खटले दाखल करण्यात आले. यावरून निजामी सत्ताधारी धर्मांतराच्याबाबत किती दबावाचे राजकारण खेळत होते हे दिसून येते. या खटल्यात श्री. माधवराव घोंसीकर आणि शंकरराव टेकरीकर याना १५ महिने वा साथीदारांना १ वर्षाची शिक्षा ठोठावण्यात आली. सुलतान येथील प्रसिध्द वकील श्री. रामचंद्र खन्ना व श्री. दत्तात्रय प्रसादजी वकील

(पं. बंसीलाल व श्यामलाल यांचे मामा) यानी आरोपीच्या बाजूने काम पाहिले. पण अपिलामध्ये हे सर्व आरोपी निर्दोष मुक्त झाले. त्यावेळी पंडित काशीनाथरावजी वैद्य, श्री. बी. रामकृष्णरावजी, पंडित विनायकरावजी विद्यालंकार, दत्तात्रय प्रसादजी इ. नी अपिलाबाबत महत्त्वपूर्ण काम केले.[४४] हिंदुना मुसलमान करीत असताना हिंदूंनी तक्रार केली तरी मुसलमानांना शासन नाही कारण तेच राज्याचे मालक होते. परंतु एखादा हिंदु मुसलमान झाला असेल आणि त्याला पुन्हा हिंदू धर्मात घेण्यासाठी कोणी परावृत्त करू लागला तर त्याला मात्र कायद्याचा बडगा दाखवण्यात येत होता. त्यामुळे कार्यकर्त्यांना शुध्दीकरणासारखे धार्मिक कार्य करण्यामध्ये फार मोठी अडचण निर्माण होत होती. हिंदूंचे संघटन करणाऱ्या आर्य समाजी कार्यकर्त्यांना व त्यांच्या चळवळीस दडपून टाकण्यासाठी सरकारकडून अनेक कुमार्गांचा अवलंब केला जात असे. पण आर्य समाजाने मात्र शुध्दिकरणाच्या आपल्या मार्गापासून माघार घेतली नाही. आर्य समाजाने केवळ हिंदूंचे संघटन केले एवढेच नाही तर बळजबरीने बाटवलेल्या हिंदूंना तसेच जन्मजात मुसलमानांनाही वैदिक पध्दतीने दिक्षा देऊन शुध्दिकरण करण्याचे कार्य द्रुतगतीने चालू ठेवले. अनेक अस्पृश्यांना आर्य समाजात घेऊन त्यांच्यापुढे हिंदू धर्माचा, हिंदू राष्ट्राचा अभिमान जीवंतपणे उभा केला. हे आर्य समाजाचे कार्य फार मोठे आणि मोलाचे कार्य आहे.[४५] उस्मानाबाद येथील आर्य समाजाचे क्रियाशील कार्यकर्ते श्री. बापूरावजी जगदाळे मास्तर यांनी तसेच श्री. गंगारामजी, श्री.मनोहरलालजी व श्री. बंसीलालजी व्यास इ. नी शुध्दिकरणाची मोहिम परिणामकारकरित्या राबवली.

हैद्राबाद राज्यात एकूण वातावरणच घबराटीचे होते. अशा वातावरणात हिंदूंना मुक्तपणे वावरणे कठीण होत असे. तेथे आर्य समाजाव्यतिरिक्त हिंदू महासभा, हैद्राबाद स्टेट कॉंग्रेस इ. संघटना कार्य करीत होत्या. पण आर्य समाज ही एकमेव अशी संघटना होती की त्यानी समाजातील सर्व जाती पंथांच्या लोकांना बरोबर घेतले होते. जे हिंदू इस्लामच्या दबावाला बळी पडून

धर्मांतरित झाले होते, अशा लोकांच्या मनामध्ये परिवर्तन करण्याचे कार्य आर्य समाजाने केले. आर्य समाजाच्या शुध्दीकरण चळवळीमुळे अनेक धर्मांतरीत हिंदूंना पुन्हा स्वधर्मामध्ये प्रवेश मिळाला. फक्त प्रवेश दिला इतकेच नव्हे तर त्यांच्या सोबत आर्य समाजी कार्यकर्त्यांनी सहभोजनेही केली. सर्वश्री शेषरावजी वाघमारे, पं.डी.आर. दास, श्री. बापूराव मास्तर, दिगंबरराव शिवणीकर, दिगंबरराव लाटकर, माधवराव धोंसीकर, श्री. बंसीलाल, श्री. श्यामलाल इ. अनेक कार्यकर्त्यांनी शुध्दिकरणाच्या चळवळीत भाग घेतला आणि समाजाच्या या कार्यामुळे हैद्राबाद राज्यातील हिंदू जनता एकत्र येऊ लागली. हिंदू धर्मातील सर्व मतभेद विसरून वेगवेगळ्या पंथाचे अन विचारांचे लोक आर्य समाजाच्या ध्वजाखाली एकत्र येत होते. जैन, लिंगायत, हरिजन, ब्राह्मण इ. सर्व पंथीय लोक मतभेद विसरून एकत्र येत होते.

इत्तेहादूल मुसल्मीनच्या मराठवाडयातील धर्मांतराच्या कारवाया हाणून पाडण्यासाठी आर्य समाज सुलतान बाजारच्यावतीने श्री. चंदूलालजी, श्री.गजानंदजी, श्री. नारायणलाल पित्ती, श्री. बलदेव पतंगे, शंकर रेड्डी व पं. नरेंद्रजी सक्सेना इ.ना पाठवले होते. त्यानी नलगोंडा व मराठवाड्यातील मुसलमान झालेल्या सात हजार हरिजनांना शुध्द करून हिंदू धर्मात घेतले. श्री. शंकर रेड्डी आणि श्री. बलदेव पतंगे या आर्य समाजी कार्यकर्त्यांनी तीन हजारापेक्षाजादा लोकांना शुध्दिकरणाचे संस्कार करून हिंदू धर्मात घेतले. त्यासाठी त्याना ब-याच शारीरिक यातनाही सहन कराव्या लागल्या. मराठवाडयामध्ये आर्य समाजी कार्यकर्त्यांनी मुस्लीम धर्मांतराच्या धोरणाला संघटितपणे विरोध केला. त्यासाठी हैद्राबादच्या आर्य प्रतिनिधी सभेने त्याना फार मोठे सहकार्य दिले. आर्य समाजाने बाटलेल्या हिंदूंनाच फक्त शुध्द करून घेतले असे नव्हे तर अनेक मुसलमानांच्यावर देखील हिंदू धर्माचे संस्कार करून त्यांना हिंदू धर्मात प्रवेश दिला.

अंबेजोगाई येथील आर्य समाजाने तीस जणांना शुध्द करून हिंदू धर्मात प्रवेश दिला, तर दोन मुसलमानांना शुध्द करून हिंदू धर्मात घेतले. नांदेड येथील समाजाचे याबाबतचे एक बोलके उदाहरण आर्य जीवन संमेलन विशेषांकामध्ये दिले आहे. " इ.स. १९३९ मध्ये आर्य समाजाची स्थापना झाली. इ.स. १९४७ साली आर्य समाजाचे एक संस्थापक सदस्य श्री. शामलाल राठौर यांच्या घरीच हे कार्यालय होते. इ.स. १९४४ मध्ये श्री. राठौर यांचा श्री. शिवरामजी जिंदम यांच्याशी परिचय झाला. ते कापडाच्या एका मुसलमान व्यापा-याकडे नोकरीस होते. शिवाय इस्लामी प्रभुत्वाकडे ते झुकले होते. तेव्हा श्री. श्यामलाल राठौर यानी त्याना ` सत्यार्थ प्रकाश ` वाचण्यास दिले. ते वाचल्यानंतर ते ऋषीभक्त झाले. त्यांनी स्वत: कपडयांचा व्यवसाय सुरू केला. त्यानी काही काळ नांदेड आर्य समाजाचे प्रधान म्हणून काम केले. त्याना शिवमुनीजी म्हणून ओळखण्यात येत असे."[४६] आर्य समाजात प्रवेश घेतल्यानंतर त्या व्यक्तीच्या मूळच्या नावाऐवजी त्यास दुसरे नाव देण्यात येत असे. उदा. रामय्या नावाचे रामचंद्र, पि-या नावाचे परमेश्वर इ. जर त्याने वैदिक धर्म स्वीकारून आर्य समाजामध्ये प्रवेश केला असेल तर त्याला ` वैदिक धर्म मे प्रवेश ` अशा आशयाचे प्रमाणपत्र देण्यात येत असे.

अशा प्रकारे आर्य समाजाने मराठवाडयात शुध्दिकरण चळवळीच्या सहाय्याने सामाजिक व धार्मिक क्षेत्रात फार मोठी जागृती निर्माण केली. समाजाच्या अशा चळवळीमुळे बळजबरीने धर्मांतर झालेल्या लोकांना आर्य समाज हा आपला आधार वाटला आणि त्यानी आर्य समाजामध्ये प्रवेश करण्यास प्रारंभ केला. आर्य समाजाच्या शुध्दीकरण चळवळीमुळे हिंदूंचे संघटन होऊन हैद्राबाद मुक्ती संग्रामाची पार्श्वभूमी तयार झाली.

वार्षिकोत्सव :

वार्षिक उत्सव हा आर्य समाजाचा धार्मिक जागृतीचा महत्वाचा उपक्रम आहे. पण अशा वार्षिक उत्सवावरसुध्दा निजामाने निर्बन्ध लादले होते. इ.स. १९३९ पासून पुन्हा वार्षिक उत्सवास जोमाने सुरवात झाली. आर्य समाजाच्या

वतीने आयोजित वार्षिक उत्सवासाठी सभेच्या वतीने प्रचारक नेमले जात असत. तसेच त्यासाठी त्यांना तिथीही ठरवून दिली जात असे. वार्षिकोत्सव म्हणजे आर्य समाजाचे एक छोटे संमेलनच होते. प्रत्येक आर्य समाजाने आपले वार्षिकोत्सव साजरे करून समाजामध्ये जागृती, संघटन इ. चे कार्य करीत रहावे हा त्या पाठीमागचा हेतू होता.

रझाकार संघटनेचा प्रमुख नेता सालार-ए-आझम-कासिम रझवी हा राहाणारा मूळचा लातूरचा होता. त्यामुळे मराठवाड्यात लातूर येथील आर्य समाजाच्या धोरणात रझाकारांच्या कारवाया हाणून पाडण्यास महत्वाचे स्थान होते. लातूरमध्ये आर्य समाजाचा प्रभाव वाढू नये यासाठी कासिम रझवी प्रयत्नशील होता. १९३५ मध्ये लातूर आर्य समाजाच्या तिसऱ्या वार्षिकोत्सवा-मध्ये गोंधळ आणि दहशत निर्माण करण्याचा रझाकारांनी प्रयत्न केला. या कामी लातूरचे स्थानिक पोलिस फौजदार (अमीन) अबरार हुसेन याने रझाकारांना अंतर्गत फूस दिली होती. उत्सवाच्या पहिल्या दिवशी कर्मवीर भाई बंसीलालजी व मुंबई आर्य समाजाचे पं. लक्ष्मणरावजी ओघळे यांच्या ओजस्वी भाषणाने संपूर्ण सभागृह हेलावून गेले. आर्य समाजाचा हा वाढता प्रभाव कासिम रझवी सारख्या कडव्या मुस्लीम नेत्यास सहन होत नसे. तो स्थानिक लातूर शाखेच्या इत्तेहादूल मुसलमीन संघटनेच्या लातूर शाखेचा अध्यक्ष होता. दुसरे दिवशी सकाळी पं. आर्यभानूजी (धारूर) यांचे सुश्राव्य भजन चालू होते, तेव्हा सभागृहाच्या चोहो-बाजूस उभा राहून मुसलमान गुंडांनी दहशत निर्माण केली. सभागृहातील स्त्रीया व आबालवृध्द घाबरून गेले. शेवटी कर्फ्यु लागू करण्यात आला. जिल्हातील पोलिसांनी अनेक गुंडांना पकडून नेले (केवळ देखावा म्हणून) श्री. अंबादासराव रेणापूरकर, जगन्नाथराव कडतने, धर्मपालजी (उदगीर), मंगलदेव दंडेवाले, भजनीक नागनाथ स्वामी, श्री. नारायण माली फुटाणे इ. अनेक लातूरचे आर्य समाजी कार्यकर्ते त्यावेळी जखमी झाले. लातूरमधील आर्य समाजी कार्यकर्ते व जनता यांच्यात ॲडव्होकेट

शेषरावजी वाघमारे यांनी धैर्य निर्माण केले.[४७] थोडक्यात आर्य समाजाच्या अशा वार्षिकोत्सवामध्ये मुसलमान गुंड धुमाकूळ घालून समाजाचा वाढणारा प्रभाव मोडून काढण्यात सातत्याने अग्रेसर असावयाचे. इतकेच नव्हे तर सरकारच्यावतीने दहशतीचे मार्ग दाखवण्यात येत असत. शिरढोण (जि. उस्मानाबाद) येथील श्री. भगवंतराव पाटील आणि गोविंदराव पटवारी यानी कळंब (जि.उस्मानाबाद) येथील आर्य समाजाच्या वार्षिक उत्सवामध्ये भाग घेतला. हा धार्मिक उत्सव आहे अशा सबबीखाली त्यांना नोकरीवरून निलंबीत करण्यात आले. तर औराद शहाजनी येथील दंगलीचे निमित्त करून चिंचोली आणि गुंजोटी (पायगा) येथील वार्षिक उत्सव साजरे करण्यास समाजास परवानगी नाकारण्यात आली. आर्य समाजाच्या मराठवाडयातील विविध शाखांमार्फत मोठया उत्साहाने वार्षिकोत्सव साजरे केले जात. अशा वार्षिकोत्सवासाठी हैद्राबादच्या आर्य प्रतिनिधी सभेच्या वतीने उपदेशक पाठवले जात असत. इ.स. १९४३ मध्ये मराठवाडयात गुंजोटी, उदगीर, लातूर, धारूर, शिरढोण, हिंगोली, चिंचोली, उस्मानाबाद, टाकळ-गव्हाण, निलंगा, मेहलेगांव तुकाराम, मोमीनाबाद, औराद इ. ठिकाणी आर्य समाज वार्षिकोत्सव साजरे करण्यात आले.[४८] हैद्राबाद राज्यातील व पर्यायाने मराठवाडयातील आर्य समाजास अंतर्गत व बाह्य उपदेशकांचे मार्गदर्शन लाभत होते. वार्षिकोत्सवासारख्या कार्यामुळे समाजामध्ये संघटितपणाची भावना वाढीस लागण्यास मदत होई. त्यामुळेच आर्य समाज ही संघशक्ती हिंदू धर्माचा जिवंतपणा हैद्राबाद सारख्या इस्लामी राज्यात एवढे कडक निर्बन्ध व दहशत असतानाही टिकवू शकली.

<u>होम हवन</u> :

आर्य समाजाच्या धार्मिक कार्यक्रमात होम हवन हा अत्यंत महत्वाचा धार्मिक विधी आहे. प्रत्येक आर्य समाज मंदिरामध्ये होम हवनाचे विधी केले जात असे. पण अशा धार्मिक कार्यावर सुध्दा निजाम सरकारने बंदी घातली. इतकेच नव्हे तर समाजाचे होम हवन कुंड उध्वस्त करण्यास देखील शासनाने कमी केले नाही.

निजामाच्या धार्मिक नितीमध्ये कुटिलता होती. दि. ६ मे १९२९ च्या एका प्रसिध्दी पत्रात " जहाँ तक सार्वजनिक शांती और व्यवस्था आज्ञा देती है, प्रत्येक व्यक्तीको पूर्ण धार्मिक स्वाधीनता प्राप्त है। " असे जाहीर केले तर ८ जुलाई १९२९ मध्ये नांदेड गुरुद्वारा बाबत खालील घोषणा केली. " यह प्रत्येक सरकार का कर्तव्य है कि वह अपने भिन्न धर्मावलंबी प्रजाजनों के जीवन, संपत्ती और धर्म स्थानों की रक्षा करे। मेरे पूर्वजों की यह निती रही है और मै भी उसी मार्ग का अनुसरण कर रहा हूँ। "[४९]

निजाम शासन एका बाजूला धार्मिकते बाबत घोषणा देत होते तर दुस-या बाजूला धार्मिक जीवनावर बंधने लादत होते. सरकारने होम हवन हे धार्मिक कृत्य मानून त्यावर बंदी घातली. २६ जानेवारी १९३८ ला गृहसचिव कार्यालयातून पत्र क्र. ३७६ नुसार हवण कुण्ड हे धार्मिक कृत्य समजून त्यावर बंदी घालण्यात आली. याला सरकारने प्रार्थनास्थळ समजून आदेश जारी केला होता. पण आर्य समाजाच्या वाढता प्रतिकार पाहून हा आदेश सरकारला मागे घ्यावा लागला.[५०] १९३५ मध्ये (२० अमरदाद १३४४ फसली) मिर्झा महमंद, कलेक्टर, बिदर याने आर्य समाज निलंगा मंदिर व हवण कुंड खोदून फेकून दिले. इतकेच नव्हे तर समाजाचे साहित्यही जप्त करण्यात आले. तेंव्हा भाई श्यामलाल, भाई बंसीलाल यानी प्रयत्नपूर्वक या अत्याचाराची सरकारला जाणीव करून दिली. यावेळी शेषराव वाघमारे यांनी लोकांच्या प्रक्षुब्ध भावनांना आवर घातला. अखेर २८ सप्टेंबर १९३६ मध्ये गृहसचिव नवाब गुलजदर जंग यांनी बिदर कलेक्टरना हे हवण कुंड व मंदिर स्वखर्चाने बांधून देण्याचा आदेश दिला.[५१] धार्मिक कार्यामध्ये येणा-या बंधनाबाबतची हकिकत एका शिष्टमंडळाने तत्कालीन हैद्राबाद राज्याचे प्रधान महाराजा किशनप्रसाद बहादूर याना सांगितली.

अशारितीने आर्य समाजाच्या हवन यज्ञाच्या दैनंदिन धार्मिक कार्यातसुध्दा निजामी सरकारकडून अनेक संकटे उभी केली जात असत. मात्र मुसलमान कोठेही आपले कपडे अंथरून नमाज पढण्यास रिकामे होते. होम हवन हा आर्य समाजाच्या दैनंदिन

धार्मिक कार्याचा भाग होता. होम हवन करणे हे प्रत्येक आर्य समाजी कार्यकर्त्याचे कर्तव्य होते. प्रत्येक आर्य समाज मंदिरामध्ये त्यासाठी हवन कुंडे बांधण्यात येत असत. आजही मराठवाड्यातील आर्य समाज मंदिरात हे कार्य दैनंदिनपणे पार पाडले जाते. तर अनेक कार्यकर्ते स्वत:च्या घरी होम हवन कार्यक्रम दैनंदिन करतात, आर्य समाजाच्या धार्मिक कार्यातील हा एक महत्वाचा भाग आहे.

<u>वेदप्रचार कार्य</u> :

इ.स. १९३७ हे वर्ष हैद्राबाद येथे स्थापन झालेल्या आर्य प्रतिनिधी सभेचे सातवे वर्ष होते. आर्य समाजात प्रत्येक कार्य उत्साहाने पार पाडण्यासाठी धडपड सुरू होती. त्यामध्येच वेद प्रचार हा एक अत्यंत महत्वाचा भाग होता. आर्य समाजी वेद प्रामाण्यावर अधिक भर देतात व वेदाकडे परत चला ( Go Back to Vedas ) असा उपदेश करतात. आपापसातील मतभेद, अनिष्ठ प्रथा व वेदांच्या अध्ययनाकडे दुर्लक्ष यामुळे हिंदू संस्कृतीचा -हास होत चालला आहे म्हणून वेदाचे अध्ययन करणे हे प्रत्येक हिंदूमात्राचे कर्तव्य आहे. दयानंदाच्या विचार-सरणीचा फार मोठा प्रभाव निर्माण झाला होता. कारण आर्य समाजाच्या तत्वामध्येच वेदाचे महत्व स्पष्ट करण्यात आले होते. वेदप्रसाराबाबत सभेने एक प्रस्ताव स्विकारलेला होता. तो पुढीलप्रमाणे :

> " यह बैठक निश्चय करती है कि हैद्राबाद स्टेट की समस्त आर्य समाजों के वेद प्रचार का प्रबंध प्रतिनिधी सभा-द्वारा ही होगा । किसी स्थान का आर्य समाज निजी उपदेशक रख कर भी प्रचार कर सकता है । परंतु उसी स्थान में जहा की वह समाज है । यदि अन्य स्थान में प्रचार करना चाहे तो उसे सभाद्वाराही जाना होगा । और यदि कोई अन्य समाज उसको प्रचारार्थ बुलाना चाहे उसको आवश्यक होगा कि उसे सभाद्वारा बुलाया जाय । "५२

अशा पध्दतीने वेद प्रचार कार्यास प्रारंभ करून प्रोत्साहन देण्यात आले. १९३० पर्यन्त आर्य समाजाची मोठ्या प्रमाणात वाढ झाली होती. १९३० पर्यन्त अनेक वेद प्रचारक समेचे काम निस्वार्थीपणाने करीत होते. समाजाच्या कार्याचा वाढता व्याप पाहून पंडीत चंद्रभानूजी ` सिध्दांत भूषण ` यांच्यावर समाजाच्या प्रचाराबाबतची जबाबदारी सोपविण्यात आली. शिवाय अनेक प्रचारकांनी वेदांचा संदेश विनावेतन ग्रामीण भागापर्यन्त पोहोचविला. यामध्ये मराठवाडयातील आर्य समाजाचे प्रचारक आघाडीवर होते. त्यामध्ये पं.श्यामलाल, पं. बंसीलाल (उदगीर), पं. रघोचमदासजी (लातूर), डॉ. अग्नीदत्तजी, पं. कर्मवीरजी, पं. प्रल्हादजी (उदगीर), पं. शेषरावजी वाघमारे (निलंगा), श्री. माधवराव धोंसीकर, श्री. वीरभद्रप्पा अंबसांगे, श्री. दिगंबररावजी पत्तेवार (लातूर), श्री. अमृतराव, श्री. आर्यभानूजी (धारूर), पं. गणपतरावजी कचले (कळंब), श्री. वीरभद्रजी आर्य (देशबंधू), औरादशहाजनी, श्री. बापूरावजी जगदाळे मास्तर (उस्मानाबाद) इ. चा विशेष उल्लेख करणे गरजेचे आहे. निजामाच्या अत्याचारी राज्यात महर्षि दयानंदांच्या वेद संदेशाचे महत्व जनतेपर्यन्त प्रसारीत करणे ही गोष्ट सोपी नव्हती. इ.स. १९४३-४४ मध्ये वेद प्रचार विभाग पं. नरेंद्रजी सक्सेना यांच्याकडे सोपवण्यात आला होता. त्यानुसार मराठवाड्यातील खालील वेद प्रचारकांनी पं.नरेंद्रजींच्या नेतृत्वाखाली महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली.

१) <u>श्री.पं.बापूरावजी जगदाळे मास्तर (उस्मानाबाद)</u>

यानी ३६ वैदिक संस्कार केले, शिराढोण (ता. कळंब, जि.उस्मानाबाद) येथील आर्य समाजाच्या वार्षिक उत्सवामध्ये वेद प्रचाराचे कार्य केले. याशिवाय त्यानी आर्य समाजाचे नवीन २९ सभासद केले तर ६८ व्याख्याने दिली.

२) <u>श्री.पं.कर्मवीरजी शास्त्री, लातूर, कळंब</u>

यानी ३० वैदिक संस्कार केले. याशिवाय आर्य समाजाची एक पाठशाळा आपसिंगा (तुळजापूर) येथे सुरू केली. तर आर्य समाज खंडाळा (तुळजापूर) ची त्यांनी

स्थापना केली. यदलेगांव तुकारामा या गावी यात्रेत प्रचार कार्य केले. याशिवाय त्यानी ५५ भाषणे दिली. (सर्व भाषणे वेद व वैदिक धर्म यावर होती)

३) श्री.पं. गणपतलालजी माडी - बेलकुंड (उस्मानाबाद)

यानी वेद प्रचार करीत असताना १५ व्याख्याने दिली व आर्य समाजाचे नवे २९ सभासद करून घेतले.

४) श्री.पं. देशबंधूजी (विरभद्रजी आर्य) औरादशहाजनी

पं. वीरभद्रजी आर्य याना वेद प्रचार कार्याबद्दल अत्यंत आवड होती. परंतु औराद शहाजनी येथील दंगलीच्या संदर्भात त्यांना अटक केल्यामुळे ते वेद प्रचार कार्य करू शकले नाहीत.[५३]

५) श्री.पं. विरेंद्रजी, हिंगोली

यानी १८ भाषणे दिली. येहलेगांव तुकाराम, टाकळ गव्हाण व हिंगोली आर्य समाजाच्या वार्षिक उत्सवामध्ये प्रचार कार्य केले. तसेच हैद्राबादहून आर्य प्रतिनिधी सभेमार्फत प्रसिध्द होणा-या ` आर्य भानू ` वृत्तपत्राचे १२ सभासद मिळवले. वांजारवाडे येथील यात्रेत वेदप्रचार कार्य केले.

६) श्री.पं. प्रल्हादजी भजनीक (धारूर)(बीड)

यानी दोन वैदिक संस्कार केले. २७ भाषणे दिली. शिवाय गुलबर्गा येथील वार्षिक उत्सवामध्ये प्रचार कार्य केले.

७) श्री.पं. शंकर देवजी (उदगीर)

वेद प्रचारकानी ३७ आर्य समाजाचे निरीक्षण केले. तसेच २३ वैदिक संस्कार केले. आर्य समाजाचे नवीन चार सभासद केले. तर १३८ भाषणे दिली.

८) श्री.पं. माधवरावजी

यानी ५० भाषणे दिली. उदगीर आर्य समाज वार्षिक उत्सवामध्ये प्रचार कार्य केले व पानगाव येथे तरूण वाचनालयाची स्थापना केली.[५४]

अनेक वेद प्रचारकांनी आर्य समाजाची भूमिका, तसेच सरकारची धोरणे यावरही प्रकाश टाकला. याशिवाय ग्रामीण भागामध्ये वेद प्रचाराचे कार्य प्रभावीपणे होण्यासाठी वेद प्रचारकांनी प्रयत्नांची पराकाष्टा करून वेदाचे महत्व आणि वैदिक धर्माची आवश्यकता पटवण्याचा प्रयत्न केला. ज्या ठिकाणी आर्य समाजाच्या शाखा नाहीत अशा ठिकाणी हे कार्य मोठया प्रमाणात हाती घेतले जात होते.

इ.स. १९३१ मध्ये उदगीरचे भाई श्यामलालजी वकील यांच्या बरोबर दिल्लीचे पं. मंगलदेवजी शास्त्री हे आपल्या धर्मपत्नीसह लातूरला आले. तेंव्हा त्यानी तेथे रामलिंगेश्वर देवालयाजवळ आपला तळ ठोकून अपरिचित लातूर शहरात वैदिक धर्म प्रचाराचे कार्य केले. आर्य समाज (मोमीनाबाद) अंबाजोगाई शाखेने वैदिक धर्म प्रसाराचे फार मोठे कार्य केले आहे. येथील आर्य समाज हा मराठवाडयातील जागृत समाज म्हणून ओळखला जात असे. इ.स. १९४३ मध्ये श्री.पं.गणपतशास्त्रीजी (रेणापूर) श्री. पं. गंगारामजी शेंडगे, श्री.पं. शेषरावजी वाघमारे (निलंगा), श्री.पं.डी.आर. दासजी वेधवाचस्पती (लातूर), श्री.पं. आर्यभानूजी (धारूर), श्री. बंसीलालजी वकील (उदगीर) इ. मराठवाडयातील उपदेशकांनी हैद्राबादच्या आर्य प्रतिनिधी सभेचे प्रतिष्ठित उपदेशक म्हणून वेद प्रचारार्थ दौरे काढून प्रचार कार्य केले. वेद प्रचार, वैदिक धर्माचा प्रसार, आर्य समाजाचे सिध्दांत इ. मधून समाजाची संघटनात्मक शक्ती वाढीस लागण्यास निश्चितच मदत झाली.

इ.स. १९४७ मध्ये मात्र आर्य समाजास आपले वेद प्रचार कार्य जोमाने चालू ठेवता आले नाही. कारण यावेळी हैद्राबाद राज्यात एकच राजकीय गोंधळ निर्माण झाला होता. विविध संघटनांच्या कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली होती.

त्यामध्ये आर्य समाजी कार्यकर्त्यांचाही समावेश होता. त्यामुळे वेद प्रचार कार्यामध्ये मोठी अडचण निर्माण झाली व विस्कळीतपणा आला. त्यामुळे वेद प्रचार कार्यामध्ये मोठी अडचण निर्माण झाली व एका बाजूला स्वतंत्र भारत व दुस-या बाजूला निजामाचे स्वतंत्र हैद्राबाद राज्य हा संघर्ष विकोपाला पोहोचला, तेव्हा आर्य समाजाने निजामी सत्ताधा-यांच्याविरूध्द आंदोलनाचा मार्ग अवलंबला.

इ.स. १९३७ पासून वेद प्रचार कार्यास प्रारंभ झाला असला तरी तत्पुर्वीच्या काळात स्थानिक पातळीवर हे प्रचार कार्य चालूच होते.

<u>श्रावणी वेद सप्ताह</u> :

आर्य समाजातर्फे श्रावण महिन्यात हा सप्ताह साजरा केला जात असे. आजही सर्व आर्य समाजांमधून श्रावणी वेद सप्ताह साजरा केला होता. या सप्ताहा-मध्ये आर्य समाजाची एक शानदार मिरवणूक निघते. त्यामध्ये हत्ती व रथाचा समावेश होता. श्रावणी वेद सप्ताह हा आर्य समाजाच्या वार्षिक उपक्रमांमधील धार्मिक कार्याचा एक महत्त्वपूर्ण भाग होता. श्रावण महिन्यातील सात दिवस चालणा-या वेद सप्ताहात प्रचार करण्यासाठी उपदेशक पाठवले जात असत. श्रावणी वेद सप्ताहामध्ये ` सत्यार्थ प्रकाश ` तसेच वेद इ. चे वाचन केले जाते. सभेकडून आलेल्या प्रचारकांचे सुश्राव्य व्याख्यान, प्रवचन इ. चा कार्यक्रम सप्ताहामध्ये ठेवला जात असे. इ.स. १९४३ मध्ये वेद सप्ताहात अनेकांनी उपदेशक म्हणून कार्य केले. त्यांनी श्रावणी वेद सप्ताहामध्ये केलेल्या मराठवाड्यातील आर्य समाजामधील प्रचाराचा तक्ता याप्रमाणे.

| क्र. | समाज | दिनांक | प्रचारक |
|---|---|---|---|
| १) | आर्य समाज, हिंगोली | २-८-४३ ते ८-८-४३ | श्री. स्वामी शिवराम पुरीजी<br>श्री. स्वामी नारायणानंद महाराज |
| २) | आर्य समाज, लातूर | १५-८-४३ ते २२-८-४३ | श्री. स्वामी नारायणानंद महाराज |
| ३) | आर्य समाज, उदगीर | २३-८-४३ ते २९-८-४३ | श्री. स्वामी नारायणानंद महाराज |
| ४) | आर्य समाज, गुंजोटी | १५-८-४३ ते २२-८-४३ | श्री.पं. प्रशांतजी प्रभाकर |
| ५) | आर्य समाज, उस्मानाबाद | २३-८-४३ ते २९-८-४३ | श्री.पं. देवीलालजी<br>श्री.पं. बापूरावजी |
| ६) | आर्य समाज, मुरुम (उस्मानाबाद) | २४-८-४३ ते ३१-८-४३ | श्री.पं. डी.आर. दास |
| ७) | आर्य समाज, किल्लारी | श्रा.श. ५ ते श्रा. शु. १३ संवत २००० | आर्य समाज किल्लारीचे सदस्य |
| ८) | आर्य समाज, अंधोरी | १५-८-४३ ते २२-८-४३ | श्री.पं. गोपाल देवजी |
| ९) | आर्य समाज, कौसगी | श्रावण पूर्णिमा | सदस्य, आर्य समाज, कौसगी |

५५

मराठवाड्यातील आर्य समाजाचे काही स्थानिक सदस्य व सभेकडून आलेले उपदेशक यांच्याकडून श्रावणी वेद सप्ताहामध्ये प्रचाराचे काम केले जात असे. याशिवाय इ.स. १९४५ ते १९४७ या काळात श्री.पं. शंकरदेवजी, श्री.पं.ज्ञानेंद्रजी यानी उमरी येथील वेद सप्ताहात भाग घेतला. श्री.पं. प्रेमचंदजी भजनोपदेशक यानी जालना येथील वेद सप्ताहामध्ये कार्य केले. श्रावणी वेद सप्ताहामध्ये वैदिक धर्माचा प्रचार तसेच किर्तन, भजन इ. च्या माध्यमातून महर्षि दयानंदांच्या शिकवणीचा

प्रसार होत असे. निजाम स्टेटमध्ये आर्य समाजाच्या धार्मिक कार्यांवर सुध्दा प्रतिबंध लादले जात होते. तथापि इ.स. १९४३ ते १९४७ पर्यन्त श्रावण वेद सप्ताह साजरे झाल्याचे उल्लेख हैद्राबाद येथील आर्य प्रतिनिधी सभेच्या वार्षिक अहवालावरून आढळून येते. इ.स. १९३० पूर्वी हे कार्य आर्य समाजाच्या शाखांमधून स्थानिक स्वरूपात पार पाडले जात असे. परंतु जेंव्हा आर्य प्रतिनिधी सभेची स्थापना झाली तेंव्हा असे श्रावणी वेद सप्ताह साजरे करण्याचे व वैदिक धर्म प्रचाराचे कार्य सभेमार्फत होऊ लागले.

मूर्तिपूजेस विरोध :

मराठवाड्यातील आर्य समाजाचा इतिहास वैदिक धर्माच्या पुनरूध्दारा-बरोबरच स्वराज्य, स्वतंत्रता प्राप्त करणा-या आंदोलनांचा इतिहास आहे. हिंदूंची आध्यात्मिक स्थिती इतकी बिघडली होती की त्यांना वेद काय आहेत हे माहित नव्हते. ईश्वर उपासनेऐवजी मूर्तिपूजा व नाना प्रकारचे अवडंबर प्रचलित झाले होते. जेंव्हा आर्य समाजाचा प्रभाव वाढत गेला तेंव्हा मात्र हिंदू सनातनवाद्यांनी आर्य समाजाच्या मूर्तिपूजा विरोधी विचारास प्रतिकार केला.[५६] मुंबईचे प्रसिध्द साप्ताहिक ' सुबोध पत्रिका ' याच्या २१ डिसेंबर १८९४ च्या अंकात असे नमूद केले आहे की स्वामी आत्मानंदजी यांनी महर्षि दयानंदाचा उपदेश श्रवण करून आर्य समाजात प्रवेश केला. आणि आपल्याजवळ असलेल्या सर्व मूर्ती नजीकच्या नदीत फेकून दिल्या. आर्य समाजाच्या अशा क्रांतीकारी विचाराचा प्रभाव राज्यामध्ये एकच खळबळ उडवून देणारा ठरला. आर्य समाजाने चार वेद प्रमाण मानले. त्याने सहा शास्त्रे व १८ पुराणे कवडीमोल ठरवली. वेदात मूर्तिपूजा, अवतारवाद, तीर्थे, पौराणिक अनुष्ठाने इ. गोष्टींचा पुरस्कार नाही. आर्य समाजी मूर्तिपूजक नाहीत तसेच ते मूर्तिपूजकही नाहीत. ते मूर्तिपूजेच्या पूर्ण विरूध्द आहेत. मूर्तिपूजेबद्दलचे हे विचार सनातनवाद्यांना अमान्य होते. आर्य समाज होम हवन इ. चा पुरस्कार करतो. बळी, कर्मकांड इ. वर सुध्दा समाजाचा विश्वास नाही. तत्कालीन हैद्राबाद राज्यातील

मराठवाडा विभागात आर्य समाजी कार्यकर्ते मूर्तीपूजेला कट्टर विरोध करणारे होते. पण काळाच्या ओघात आज मूर्तिपूजेला विरोध करणाऱ्यांची संख्या फारच कमी वाटते.

शास्त्रार्थाचा उपक्रम :

आर्य समाज हा सुधारणावादी असल्यामुळे सुधारणावादी आर्य सनातनी यांच्यामध्ये त्या काळात खूप वादावादी झाली. शास्त्रार्थ म्हणजे धार्मिक बाबीसंबंधीचा वादविवाद. आर्य समाजामध्ये अनेक नामवंत पंडितांचा समावेश होता. ते बुध्दिमान होते. त्यांच्या बुध्दिचातुर्यापुढे प्रतिस्पर्धी पराभूत होत असत. हा शास्त्रार्थ काही वेळा सनातनी हिंदू व आर्य प्रचारक यांच्यामध्येच होत असे पण काही वेळा तो मुस्लीम मौल्वी व आर्य समाजी पंडीत यांच्यात होई. पं.रामचंद्रजी देहल्वी याना शास्त्रार्थाचे महारथी म्हणून ओळखण्यात येई. त्यानी कुराणामधील वाक्ये जशीच्या तशी उधृत करून तुलनेने वैदिक धर्म कसा सर्वश्रेष्ठ आहे हे पटवून दिले. पं. रामचंद्रजींच्या शास्त्रार्थामुळे हैद्राबाद राज्यात व पर्यायाने मराठवाड्यात धर्म प्रचारास फार मोठी गती मिळाली. अखेर पं.रामचंद्रजी देहल्वी यांच्यावर सरकारने आकसापोटी निर्बन्ध लादून खटले दाखले केले, याचा अर्थ स्वढाच की इस्लामी प्रचारकांकडे स्वधर्माचे महत्व पटवण्या इतपत कार्यक्षमता नव्हती. निजामाचे प्रधानमंत्री महाराजा किशनप्रसाद देखील पं.रामचंद्र देहल्वींच्या शास्त्रार्थाने भारावून गेले होते. इतकेच नव्हे तर ते आर्य समाजाच्या वार्षिकोत्सवामध्ये एक दोन वेळा सहभागी झाले होते. शास्त्रार्थ म्हणजे आर्य समाजाची खरीखुरी जाणीव करून देणारा धार्मिक उपक्रम होता. सनातन धर्मियांशी शास्त्रार्थ करण्यामध्ये पं. बाळकृष्ण शर्मा, स्वामी विश्वेश्वरानंद, स्वामी नित्यानंदजी महाराज, पं. ज्वालाप्रसादजी शर्मा, पं. पूर्णानंद जी महाराज, पं. सोमेनाथरावजी, श्री. अच्युतस्वामी, पं.आर्यमानूजी इ. आर्य समाजी पंडीतांचा समावेश होता. ते सर्वजण शास्त्रार्थ पंडीत म्हणून प्रसिध्द होते. त्यापैकी बहुतेक जण उत्तर भारतातून आले होते. ते मुसलमान व सनातन्यांना रोख ठोक उत्तर देऊन आर्य समाजाचा हैद्राबाद राज्यात व मराठवाड्यात प्रभाव निर्माण करीत होते.

इ.स. १९३४ मध्ये निजामाशी तडजोड होऊन उर्दूमध्ये ` वैदिक आदर्श ` हे साप्ताहिक सुरू करण्याची आर्य प्रतिनिधी सभेस परवानगी मिळाली. परंतु इ.स. १९३५ मध्ये मुस्लीम सनातनवाद्यांच्या प्रवृत्तीमुळे व वैदिक आदर्श मधील निर्भय व निर्भिड लिखाणामुळे या साप्ताहिकावर सरकारने बंदी घातली. त्या ` वैदिक आदर्श ` मधील एक शास्त्रार्थ प्रसंग खाली देत आहे. मूळ उर्दू भाषेतील मजकूराचा मराठी अनुवाद खालील प्रमाणे.

निलंग्यात शास्त्रार्थ-वैदिक धर्माचा शानदार
विजय, काही लोकांचा वैदिक धर्मात प्रवेश

" श्री. पूज्य करमानंदजी महाराज शास्त्रार्थ केसरी, चिडगुपा, हाल्लीखेड आणि मालकी या ठिकाणी वैदिक धर्माचा प्रचार करीत निलंगा या ठिकाणी आले. निलंगा निजामाच्या काळातील हैद्राबाद राज्यातील प्रसिध्द आणि नावाजलेला तालुका होता. त्या ठिकाणी संस्कृत भाषेचा खूप प्रचार होता. स्वामी करमानंदजी यानी सात दिवसपर्यन्त महादेवाच्या मंदिरात ` वैदिक धर्माचे महत्त्व ` या विषयावर विद्वतापूर्वक प्रवचन दिले. त्याचा प्रभाव हिंदू जनतेवर पडला. सनातन धर्माच्या पंडितांनी स्वामी करमानंदजींना संस्कृत भाषेत एक पत्र पाठवले. ज्याप्रमाणे मूर्तिपूजा, पुराणे यावर व्याख्यान आहे. आपण आवश्य त्यामध्ये भाग घेतला पाहिजे. या पत्राचे उत्तर स्वामीजींनी अशाप्रकारे दिले की, मी कुणाचे प्रवचन ऐकण्यासाठी इथे आलो नाही. वैदिक सिध्दांताला अनुसरून शास्त्रार्थ करण्याकरिता आलो आहे. सनातन पंडितांनी त्यांच्या आव्हानाला कबुली दिली. महादेवाच्या मंदिरात सनातनी पंडीत व स्वामीजींच्या दरम्यान जोरदार शास्त्रार्थ झाला. स्वामीजींनी मूर्तिपूजेविरूध्द अनेक प्रमाण दिले. दोन तासपर्यन्त शास्त्रार्थ होणार होता, पण तो एका तासात संपला. कारण सनातनी पंडीत लगेच पराभूत झाले. या शास्त्रार्थाचा लोकांवर चांगलाच परिणाम झाला. दुसऱ्या दिवशी सनातनी वर्गाकडून सार्वजनिक सभा घेण्यात आली आणि त्यांनी

स्वामीजींच्या प्रश्नाला उत्तरे देण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण ते एकाही प्रश्नाचे उत्तर देऊ शकले नाहीत. वेद, पुराण आणि शास्त्राच्या आधारावर स्वामीजींनी असे सिध्द केले की मूर्तिपूजेचा प्रचारक जैन धर्म आहे. मूर्तिपूजा महान पाप आहे. या शास्त्रार्थाचा इतका प्रभाव पडला की त्यामुळे सनातनी विचार-सरणीच्या किती तरी लोकांनी आर्य समाजामध्ये प्रवेश केला. यानंतर स्वामीजी औराद, गंजरगा आणि तुंगावला गेले."[५७]

"शास्त्रार्थ" हा सामाजिक जीवनावर प्रभाव पाडणारा आर्य समाजाचा महत्वपूर्ण उपक्रम होता. त्याच्या माध्यमातून समाजाच्या प्रचाराचे कार्य केले जात असे. " इ.स. १९३२ मध्ये लातूरमध्ये तत्कालीन व्यंकटेश थिएटरमध्ये डेप्युटी कलेक्टर मिर्झा मेंहंदी हुसेन यांच्या अध्यक्षतेखाली आर्य समाजाचे शास्त्रार्थ महारथी आर्य संन्यासी स्वामी कर्मानंदजी तथा श्री. चंद्रभानुजी सिध्दांत शिरोमणी (दिल्ली) यानी सनातनी शास्त्रार्थी प्रज्ञाचक्षु श्री. काळूरामजी शास्त्री यांच्या बरोबर झालेल्या शास्त्रार्थात त्यांचे तोंड बंद केले. पण सूक्ष्म दृष्टीने पाहिले तर शास्त्रार्थामुळेच समाजात दोन विभाग तयार झाले. सनातनवाद्यांनी आर्य समाज विरोधी भूमिका घेतली. तथापि विधवा विवाह, मूर्तिपूजा इ. विषयामधून आर्य समाज प्रचारकांनी अग्निदिव्य केले. त्यामुळे जनता जनार्दनास नवी दिशा मिळाली. तर जनसमुदाय आर्य समाजाच्या बाजूस आकर्षित होऊ लागला.[५८] अशा शास्त्रार्थ कार्यक्रमामध्ये "ईश्वर, जीव, प्रकृती, पशुबळी वेदाविरूध्द आहे" इ. अनेक विषयांवर पंडितांचा वादविवाद होत असे. थोडक्यात हैद्राबाद राज्यामध्ये आणि मराठवाडयात झालेल्या शास्त्रार्थामुळेच वैदिक धर्माचे महत्व लोकांना पटण्यास मोठया प्रमाणात मदत झाली. शिवाय सनातनी पंडीत व मुसलमान प्रचारकांची दुष्टकृत्ये यामुळे उघडकीस आली. अशा धार्मिक उपक्रमामुळेच हैद्राबादच्या निजामी राजवटीत आर्य समाज ही एक प्रबळ संघटना म्हणून उभा राहू शकला.

साप्ताहिक सत्संग :

आर्य समाजाच्या प्रत्येक समाज मंदिरामध्ये साप्ताहिक सत्संग नियमितपणे चालू असतात. सत्संगामध्ये प्रामुख्याने वैदिक धर्मावर प्रवचने दिली जातात. तसेच संध्या, हवन, याशिवाय ` सत्यार्थ प्रकाश ` चे वाचनही करण्यात येते. वेद वाचन, वेद अध्ययन इ. मधून वैदिक धर्माचे अधिष्ठान उंचावण्याचा प्रयत्न केला जातो.

आर्य समाजामध्ये साप्ताहिक सत्संग हे एक महत्वपूर्ण धार्मिक कार्य आहे. निजाम सरकारने ज्या अनेक धार्मिक कार्यावर बंदी घातली होती त्यामध्ये साप्ताहिक सत्संगाचाही समावेश होता. यामध्ये बाहेरील अनेक उपदेशकही व्याख्यानासाठी (प्रवचनासाठी) येत असत. सत्संगाच्या संदर्भात हैद्राबाद सरकारचे एक पत्र खालील-प्रमाणे आहे.

" नायब कोतवाल सी.आय.डी., हैद्राबाद अर्धसरकारी
तिथी ११ खुरदाद १३४७ फसली

मंत्री आर्य समाज सुलतान बाजार -

आप अपने समाजमें आज साप्ताहिक हवन और प्रार्थनाएँ करनेवाले है, वर्तमान परिस्थिती में वह उचित नही है कि बाहेर वाले सभा में भाषण दें, पं.देवेंद्रनाथ एक बाहर के व्यक्ति है, उन्हे लेक्चर की आज्ञा न दी जाय। यदि आपने ऐसा न किया तो पंडीतजी के कार्य के लिए आपको उत्तरदाता ठहराया जाएगा। "५९

साप्ताहिक सत्संगामध्ये बाहेरील उपदेशकांच्या भाषणास अगोदर सरकारची बंदी नव्हती. परंतु समाजाचा धार्मिक कार्यातील वाढता प्रभाव पाहून अशी ऑर्डर काढण्यात आली असावी.

मराठवाड्यात धारूर (फत्तेहाबाद) मोमिनाबाद (अंबाजोगाई) गुंजोटी (पायगा), नांदेड, लातूर, जालना इ. अनेक आर्य समाज शाखांमध्ये साप्ताहिक सत्संगाचे कार्यक्रम उत्साहाने पार पाडले जात. काही वेळा सरकारी आदेशांची पर्वा न करता व प्रसंगी शिक्षा भोगून कार्यकर्त्यांनी सत्संग पार पाडले आहेत. जालना आर्य समाजाचे मंत्री श्री. मांगीलालजी यांच्या विरूध्दा धारा (कलम) ६४ आसफियाद कायदा अंतर्गत विना परवाना गोपीनाथ मंदिरामध्ये धर्मोपदेश केला म्हणून खटला चालवला. त्यामध्ये त्याना तीन महिने दंडाची सजा ठोठावण्यात आली.

अशा साप्ताहिक सत्संगामधून मुस्लीमांच्या धर्म भावना दुखावल्या जातात असे मुसलमान सनातनवाद्यांचे मत होते. ` उल्टा चोर कोतवाल को डांटे ` या हिंदी म्हणीनुसार हा सर्व प्रकार चालू होता. पं. बंसीलालजी व पं.श्यामलालजी यानी या कार्याबाबत फार परिश्रम घेतले. साप्ताहिक सत्संगामधून आर्य समाजाच्या वतीने जागृती निर्माण करण्याचे कार्य केले जात होते.

आर्य समाजाच्या वतीने वरील धार्मिक कार्याबरोबरच गोरक्षा आंदोलन, वेदवाचन, वेद अध्ययन, बृहद यज्ञ इ. सारखे धार्मिक उपक्रम केले जात.

सत्यार्थ प्रकाश दिवस :

प्रत्येक वर्षी महर्षि दयानंद निर्वाण महोत्सव प्रसंगी सत्यार्थ प्रकाश सप्ताह साजरा केला जातो. त्यामध्ये विद्वानांची व्याख्याने आयोजित करून सत्यार्थ प्रकाशाचे महत्व विषद केले जाते. त्या सत्यार्थ प्रकाशामुळे वेदातले ज्ञान भांडार खुले केले गेले. इ.स. १८७४ मध्ये महर्षिंनी ` सत्यार्थ प्रकाश ` हा ग्रंथ हिंदी भाषेत लिहून ठेवला. त्यामध्ये समाजाची तत्वे व नियम सांगून रूढीप्रिय हिंदूधर्मांचे खंडन केले आहे. निजामी राजवटीत ` सत्यार्थ प्रकाश ` हा ग्रंथ वाचण्यास व जवळ ठेवण्यास बंदी होती. कोर्ट उमरगा (पायगा) चे एक आर्य कार्यकर्ते

श्री.पं. रामचंद्रजी यांच्याकडून पोलिस जनाब मुहमद मस्तान साहेब यानी निशान ६ ता. ६ आजूर रू. १३४६ फसली नुसार " निजाम राज्यात सत्यार्थ प्रकाश आणणे व वाचणे यावर मनाई आहे " असा आदेश जारी केला होता. पण आर्य समाजाच्या प्रभावी आंदोलनामुळे २६ बहमन सन १३४६ फसलीमध्ये ही प्रत पं. रामचंद्रजींना सन्मानपूर्वक देण्यात आली.[६०] आर्य समाजाच्या जीवनात वरील ग्रंथाचे असणारे महत्व लक्षात येते. म्हणूनच ` सत्यार्थ प्रकाश ` दिवस प्रत्येक आर्य समाजी साजरा करीत असे. हैद्राबाद राज्यामध्ये आर्य समाजास हा दिवस अत्यंत महत्वाचा आणि मोलाचा वाटतो.

<u>ओइम ध्वज दिवस</u> :

प्रत्येक धर्माचा ध्वज हा त्या धर्माचा मानबिंदू असतो. आर्य समाजाचा ध्वज भगवा असून त्यावर ` ओइम ` हे अक्षर आहे. पण हैद्राबाद सरकारने मात्र परमेश्वराचे नाव असणाऱ्या या ध्वजावर बंदी घातली. दि. ६-४-१९३८ रोजी कल्याणी येथील आर्य समाज मंदिरावरील ध्वज जबरदस्तीने काढून टाकण्यात आला. तथापि सभेच्या निश्चयानुसार २० सप्टेंबर १९४७ हा दिवस हैद्राबाद राज्यात ` ओइम ` ध्वज दिवस म्हणून साजरा करून घराघरावर ध्वज उभा करण्यात आले त्यासाठी समाजास देशव्यापी आंदोलन करावे लागले. अखेर आंदोलनापुढे निजाम सरकारला झुकावे लागले. त्यांनी ध्वजावर घातलेली बंदी पूर्णपणे उठवली. आर्य समाजाच्या मंदिरावर ` ओइम ` ध्वज तेंव्हापासून सर्वत्र फडकू लागला.

अशा आर्य समाज मंदिरामध्ये राष्ट्रीय गीत व खालील प्रार्थनाही म्हणण्यात येत असे. ही प्रार्थना व राष्ट्रीय गीत श्री. बळीराम पाटील, निलंगा यांनी म्हणून दाखविले त्यातील थोडा भाग देत आहे.[६१]

<u>प्रार्थना</u> :

है प्रभा आनंद दाता ।
ज्ञान हमको दीजिए ।
दूर करके हर बुराई ।
को भलाई दिजीए ।

<u>राष्ट्रगीत</u> :

जयती ओम ध्वज ओम बिहारे ।
विश्व प्रेम प्रतिमा मे प्यारे ।
इसके शान न जाने पाहे ।
चाहे जान भलेहि जाये ।
विश्व विजय कर कैं दिखलाये ।
तब पूर्ण प्रणाम हमारा ।

अशारितीने समाज मंदिरात सकाळी प्रार्थना व राष्ट्रगीत म्हणण्यात येत असे.

आधुनिक भारताच्या धार्मिक व सामाजिक सुधारणा चळवळींच्या इतिहास आर्य समाजाचे स्थान महनीय आहे. हैद्राबाद राज्यात आर्य समाजाने केलेले कार्य केवळ बुध्दिजीवी वर्गासाठी नव्हते तर समाजाने बहुजन समाजाची दु:खे दूर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. जर आर्य समाजाने हे कार्य केले नसते तर मराठवाड्यात एकही हिंदू, हिंदू म्हणून, जगू शकला नसता. पशूपेक्षाही त्याची स्थिती दयनीय झाली असती हे नाकारून कसे चालेल ? हिंदू समाजात परस्पर प्रेमाची भावना आर्य समाजाने निर्माण केली. आंतरजातीय विवाह, जातीयता निर्मूलन, शुध्दिकरण चळवळ इ. सारख्या सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील सुधारणावादी कार्यांमधून आर्य समाजाने लोकांच्यामध्ये आर्य समाजाने लोकांच्यामध्ये नवचैतन्याची भावना निर्माण केली. अशा कार्यांबरोबरच हैद्राबाद राज्यामध्ये हिंदूंच्या स्वातंत्र्यासाठी आर्य समाजाला राजकीय रंग धारण करावा लागला. त्यामध्ये

हजारो आर्य समाजी लोकांनी प्राणपणाने झुंज दिली. मराठवाड्यातील आर्य समाज सुधारणावादी कार्यात सतत आघाडीवर होता.

आर्य समाजातील कार्यकर्त्यांनी आपल्या कार्यातून सुधारणा चळवळीचे लोण सर्वत्र पसरविण्यास प्रारंभ केला. सुधारणेतून लोकजागृतीचे आणि राष्ट्रधर्माचे महत्व जनतेला पटू लागले. शुध्द वैदिक धर्माच्या प्रचारातून सुधारणा चळवळीची पार्श्वभूमी तयार होत गेली. आर्य समाजाने हैद्राबाद मुक्ती संग्रामाला सुधारणा-वादाचा आशय प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला. हैद्राबाद संस्थानातील व पर्यायाने मराठवाड्यातील जनतेला आर्य समाजाचे सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील कार्य विसरता येणार नाही.

## संदर्भ

१) बिंदू दिगंबरराव - हैद्राबाद राज्याचे विसर्जन, पृ. २५, २६.
२) तीर्थ स्वामी रामानंद - हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामाच्या आठवणी, पृ.६४-६५.
३) पोतदार वसंत ब. - हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम, पृ. ३२.
४) वेदालंकार क्षितीश - निजाम की जेलमे, पृ. १०३.
५) आर्य प्रतिनिधी सभा, हैद्राबाद स्टेट का कार्यविवरण (१९३१ ते १९४०), पृ.१२.
६) किंवा, पृ. १३.
७) किंवा, पृ. १३.
८) किंवा, पृ. १४.
९) किंवा, पृ. १५.
१०) विद्यालंकार जयदेव शर्मा - हैद्राबाद सत्याग्रह का रक्तरंजित इतिहास, पृ.८४.
११) कुलकर्णी खंडेराव, विनायकराव विद्यालंकार, पृ. १२६.
१२) पगडी सेतु माधवराव - जीवनसेतू, पृ. ३२३-२४.
१३) तीर्थ स्वामी रामानंद - उ.नि.पृ. ९०.
१४) विद्यालंकार जयदेव शर्मा - उ.नि.पृ. १००-१०१.
१५) निजाम डिफेन्स - एक्झामिनड ॲन्ड एक्सपोजड, पृ. ७७.
१६) निजामशाही में धार्मिक स्वतंत्रतापर कुठाराघात अर्थात धर्मसंबंधी आज्ञाओं का संग्रह, पृ. ३२.
१७) निजाम डिफेन्स - एक्झामिनड ॲन्ड एक्सपोजड, पृ. ८२.
१८) पोतदार वसंत ब. - उ.नि.पृ. ३५.
१९) स्नेही नरदेव व तेरकर पां.व्य. - आर्य समाज : समाजकारण आणि राजकारण प्रा. भगवान काळे (सं.) ` मराठवाडा काल आणि आज ` या ग्रंथातील लेख, पृ. २८८.
२०) किंवा, पृ. २९०-९१.

२१) उत्तममुनीजी वानप्रस्थी यांची प्रत्यक्ष मुलाखत, उस्मानाबाद, दि. २५-६-१९८७.

२२) तेरकर पां.व्य. - आर्य नेता स्व. आनंदमुनीजी, वैदिक गर्जना (पाक्षिक), १४ मार्च १९८४ मधील लेख, पृ. ९.

२३) पेंदे देविदासराव (देवमुनी वानप्रस्थी), आर्य समाज, तुळजापूर यांची घेण्यात आलेली प्रत्यक्ष मुलाखत, दि. १२ जानेवारी १९८७.

२४) आर्य प्रतिनिधी सभा, हैद्राबाद स्टेट का तेरहवाँ वार्षिक अहवाल (५ एप्रिल १९४३ ते २४ मार्च १९४४), पृ. १५.

२५) उत्तममुनीजी वानप्रस्थी यांनी धर्माबाद, जि. नांदेड येथून दि. १२-८-१९८८ रोजी पाठवलेल्या पत्रामधून उदघृत.

२६) विद्यालंकार सत्यकेतू - आर्य समाज का इतिहास भाग-२, पृ. ५७८.

२७) आर्य प्रतिनिधी सभा, हैद्राबाद स्टेट का तेरहवाँ वार्षिक अहवाल (५ एप्रिल, १९४३ ते २४ मार्च १९४४) पृ. २९.

२८) पंडीत नरेंद्रजी - हैद्राबाद के आर्यों की साधना और संघर्ष, पृ. १७३.

२९) किता, पृ. १७४.

३०) आर्य जीवन, संमेलन विशेषांक, जुलै, १९७१, पृ.६१.

३१) विद्यालंकार जयदेव शर्मा - उ.नि.पृ. ५९.

३२) जगताप कृष्णाथराव, तुळजापूर यांची घेण्यात आलेली प्रत्यक्ष मुलाखत, १३ जानेवारी १९८७.

३३) आर्य प्रतिनिधी सभा, हैद्राबाद स्टेट का कार्यविवरण (१९३१ ते १९४०), पृ. १८-१९.

३४) किता, पृ. ५०-५१.

३५) आर्य जीवन संमेलन, विशेषांक, जुलै, १९७१, पृ.६२.

३६) कुर्ुंदकर नरहर - हैद्राबाद मुक्ती संग्राम आणि आर्य समाज, वैदिक गर्जना (पाक्षिक) १ जानेवारी १९८४ मधील लेख, पृ. १०.

३७) आडगावकर सुनिल - हैद्राबाद मुक्तीसंग्राम आणि आर्य समाज, वैदिक गर्जना, महासंमेलन विशेषांक, १९८२ मधील लेख, पृ. २४.

३८) निजामशाहीमें धार्मिक स्वतंत्रता पर कुठाराघात अर्थात धर्मसंबंधी आज्ञाओं का संग्रह, पृ. ३.

३९) पगडी सेतू माधवराव - उ.नि.पृ. ३०४.

४०) विद्यालंकार जयदेव शर्मा - उ.नि.पृ. ७७-७८.

४१) वेदालंकार क्षितीश - उ.नि.पृ. १०८.

४२) पोतदार वसंत ब. - उ.नि.पृ. ३८.

४३) पं.नरेंद्र - हैद्राबाद के आर्यों की साधना और संघर्ष, पृ. ७७.

४४) किंवा, पृ . १०६.

४५) पोतदार वसंत ब. - उ.नि.पृ. ३८.

४६) आर्य जीवन संमेलन, विशेषांक, जुलै, १९७१, पृ.७३.

४७) किंवा, पृ. ५९.

४८) आर्य प्रतिनिधी सभा, हैद्राबाद स्टेट का तेरहवाँ वार्षिक विवरण (५ एप्रिल, १९४३ ते २४ मार्च, १९४४), पृ. ११-१२.

४९) वाचस्पती इंद्रविद्या - आर्य समाज का इतिहास भाग-२, पृ. २५२-५३.

५०) पं. नरेंद्र, उ.नि.पृ. ८१.

५१) किंवा, पृ. ८६-८७.

५२) आर्य प्रतिनिधी सभा, हैद्राबाद स्टेट का वार्षिक विवरण (१९३१ ते १९४०), पृ. २८-२९.

५३) आर्य प्रतिनिधी सभा, हैद्राबाद स्टेट का तेरहवाँ वार्षिक विवरण, (५ एप्रिल १९४३ ते २४ मार्च १९४४), पृ. ७-८.

५४) आर्य प्रतिनिधी सभा, हैद्राबाद राज्य का चौदहवाँ वार्षिक विवरण (१९४४-४९) वरून उद्धृत.

५५) आर्य प्रतिनिधी सभा, हैद्राबाद स्टेट का तेरहवाँ वार्षिक विवरण (५ एप्रिल, १९४३ ते २४ मार्च १९४४), पृ. १०.

५६) स्नेही नरदेव व तेरकर पां.व्य. - उ.नि.पृ. २८६.

५७) वैदिक आदर्श (आर्य समाजाचे मूळ उर्दू भाषेतील वृत्तपत्र) १९३४, उपलब्ध आर्य प्रतिनिधी सभा, सुलतान बाजार, हैद्राबाद मधून उद्धृत.

५८) आर्य जीवन संमेलन विशेषांक, जुलै, १९७१, पृ. ५८.

५९) विद्यालंकार जयदेव शर्मा - उ.नि. पृ. ६३.

६०) <u>आर्य प्रतिनिधी सभा, हैद्राबाद स्टेट का वार्षिक विवरण</u> (१९३१ ते १९४०), पृ. २७.

६१) श्री. पाटील बळीराम, निलंगा, जि. लातूर यांची घेण्यात आलेली प्रत्यक्ष मुलाखत, दि. २१-८-१९८८.